दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–७६ बुधवार दि.२६ जून २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

### वायू प्रदूषणाचे भिषण वास्तव !

काही वर्षांपासून वायू प्रदुषणाचा प्रकोप वाढत चालला आहे त्यामुळे माणसाला श्वास घेणे मुश्कील झाले आहे. पर्यायाने श्वास सोडावे लागत आहेत. अर्थात याला बव्हंशी माणसाचे कर्तृत्वही कारणीभूत आहे. निसर्गावर आक्रमणाचा प्रयत्न झाला की उलट तडाखा बसणारच. झपाट्याने वाढत चाललेल्या वायू प्रदुषणाचा जोर का झटका भारतासह संपूर्ण जगाला बसला आहे, बसतो आहे. भीषण वायू प्रदुषणामुळे २०२१ साली जगभरात ८१ लाख लोकांचा बळी गेला. त्यात भारतातील २१ लाख तर चीनमधील २३ लाख बळींचा समावेश आहे.

### नाशिक जिल्ह्यात स्वाईन फ्लूचा दहावा बळी

नाशिकः नाशिकमध्ये स्वाईन फ्लूचा प्रादुर्भाव वाढू लागला असून, निफाडच्या ५८ वर्षीय व्यक्तीचा या आजाराने मृत्यू झाल्याने जिल्ह्यातील स्वाईन फ्लू बळींचा आकडा दहावर गेला आहे. चालु महिन्यात नाशिक शहरात पाच तर ग्रामीण भागात एक नवा स्वाईन फ्लू बाधित आढळल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. बदलते वातावरण स्वाईन फ्लू आजाराच्या प्रादुर्भावासाठी पोषक ठरले आहे. जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यात शहरात स्वाईन फ्लूचे २३ बाधित रुग्ण आढळून आले होते. एप्रिलमध्ये जेलरोड येथील ५९ वर्षीय डॉक्टरचा या आजारामुळे मृत्यू झाल्याने या आजाराचे गांभीर्य वाढले. त्यानंतर मे महिन्यातील कडक उन्हातही या आजाराचा प्रसार वाढत गेला.

# शेतकऱ्यांना सीबील मागणाऱ्या बँकांविरुद्ध आता सरळ एफआयआर

## » सरकार शेतकऱ्यांप्रती गंभीर, फडणवीसांचा बँकांना इशारा

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पीक कर्ज नाकारणाऱ्या बँकावर एफआयआर दाखल करणार असल्याचा इशारा दिला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मंगळवारी (दि.२५) मुंबईतील सह्याद्री अतिगृहावर खरीप हंगामाच्या बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीनंतर फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह कृषीमंत्री धनंजय मुंडे, दिलीप वळसे पाटील, राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते. तसेच रिझर्व्ह बँक, नाबार्ड आणि राष्ट्रीयीकृत बँकांचे वरिष्ठ अधिकारी देखील उपस्थित होते.**

फडणवीस म्हणाले, ''पीक कर्जासाठी सीबीलची कारणे बँकांकडून दिले जात आहेत. तर कर्ज देताना टाळाटाळ केली जात आहे. त्यामुळे आता अडवणूक किंवा टाळाटाळ केल्यास बँकांवर एफआयआर दाखल केला जाईल. एफआयआर झाल्यानंतर आमच्याकडे येऊ नका.'' असा इशाराही फडणवीस यांनी बँकांच्या अधिकाऱ्यांना दिला आहे.



या बैठकीत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे प्रतिनिधी आणि राज्यस्तरीय बँकर्स समितीची चर्चा झाली. यावेळी सीबीलबाबत सूचना करण्यात आल्या. शेतकऱ्यांना पीक कर्ज देताना सीबीलची अट लागू करणार नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र प्रत्यक्षात बँकांकडून शेतकऱ्यांना पीक कर्ज देताना सीबीलची सक्ती केली जात आहे. त्यांना पीक कर्ज नाकारले जात आहे. पण आता असे काही झाले तर थेट बँकांवर एफआरआय दाखल करू, असे फडणवीस यांनी म्हटले आहे. दरम्यान, यापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी यांनी देखील सीबील सक्तीबाबत बँकांना निर्देश दिले होते. मात्र आता पुन्हा सीबीलची सक्ती बँकांकडून केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज मिळत नाही. यामुळे सरकारने कडक पावले उचलली आहेत.

## नीट पेपरफुटी प्रकरणी संजय जाधवला २ जुलैपर्यंत पोलीस कोठडी

**लातूर । प्रतिनिधी**

**नीट पेपर फुटी प्रकरणातील फरार आरोपी शिक्षक संजय तुकाराम जाधव (रा. लातूर) याला येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सोमवारी (दि.२४) रात्री उशीरा अटक केली होती. मंगळवारी (दि.२६) त्याला पोलिसांनी न्यायालयात हजर केले असता मुख्य न्यायदंडाधिकारी एन. एन. चव्हाण यांनी त्याला २ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.**

नीटच्या पेपरफुटीत सहभाग असल्याच्या संशयावरुन नांदेड येथील एटीएस पथकाने २२ जून रोजी जलील उमरखा पठाण व संजय जाधव यांची चौकशी केली होती. चौकशीनंतर त्यांना सोडून दिले होते. तथापि गरज भासल्यास बोलावले जाईल. त्यामुळे तुम्ही कोठेही जावू नका, असे पोलिसांनी त्यांना बजावले होते. दरम्यान, या प्रकरणातील या दोन आरोपींसह उमरगा येथील इरान्ना कोनगलवार यांचे एकूण सहा मोबाईल पोलिसांनी जप्त करुन तपासले असता त्यात नीटच्या विद्यार्थ्यांची हॉल तिकीट, विद्यार्थ्यांशी व्हॉट्सॲपवर त्यांनी केलेली चॅटिंग, आर्थिक व्यवहार संबंधीची माहिती आढळली. आरोपी एकमेकांच्या संपर्कात होते. पैशाच्या मोबदल्यात ते काम करीत होते. संजय जाधव हा इच्छुक विद्यार्थी किंवा त्यांचे पालक हेरायचा त्यांच्याकडून पैसे घेवून तो इरन्ना कोनगलवारकडे पाठवायचा अशी माहिती प्राथमिक तपासात समोर आली आहे. जलील उमरखा पठाण याला २३ जुलैरोजी पोलिसांनी अटक केली होती. सध्या तो पोलिस कोठडीत आहे. परंतु संजय जाधव फरार होता. त्याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सोमवारी रात्री अटक केली. नीट प्रकरणात संजय जाधव याचा संबंध असून या प्रकरणाची पाळेमुळे विस्तारली आहेत. ती शोधून काढण्यासाठी व या प्रकरणाचे अन्य धागेदोरे, सहभागी, संशयित यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी आरोपी संजय जाधवला दहा दिवसांची पोलिस कोठडी द्यावी, असा युक्तीवाद सरकारी ◀◀ पान २ वर

# तुम्ही पलट्या मारल्या तर सरकार पलटी करणार!

## मनोज जरांगेंचा सरकारला इशारा

**जालना । प्रतिनिधी**

राज्य सरकारसमोरील मराठा आरक्षणाचा तिढा अद्याप कायम असून उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील आपल्या मागण्यांवर ठाम आहेत. जरांगे यांनी राज्य सरकारला १३ जुलैपर्यंतचा अवधी दिला असून, त्यानंतर आपण सरकारचे काहीही ऐकून घेणार नाही, असे त्यांनी म्हटले. तुम्ही पलट्या मारल्या तर तुमचे सरकार म्या पलटी केलंच



समजायचे, अशा शब्दात जरांगे यांनी सरकारला इशाराही दिला आहे. उपोषणानंतर रुग्णालयात उपचार घेत असलेले मनोज जरांगे मंगळवारी अंतरवाली सराटी गावात आले, त्यावेळी गावकऱ्यांना उद्देशून भाषण केले. मी अंतरवलीत येण्यासाठी आसूसलेलो होतो, मरणाच्या शेवटच्या घटकासोबत मी समाजासोबतच राहणार असल्याचे जरांगे यांनी म्हटले. जरांगे यांनी आपल्या भाषणातून पुन्हा एकदा छगन भुजबळ यांना टोला लगावला. आपल्या विरोधात कितीही जातीवाद केला, कतीही टोळ्या एकत्र आल्या तरी आपण जातीवाद करायचा नाही. अंतरवलीतील ◀◀ पान २ वर

### एकमेकांच्या मदतीच्या भूमिकेत राहा

**» कोणता तरी नेता सांगतोय म्हणून आपण बिघडायचे आणि रोष व्यक्त करायचा. आपल्याला एकमेकांचे चेहरे बघायचे आहेत, रामराम घालायचा आहे, शेतात एकमेकांना काही अडचण आली तर मदतीला जायचे आहे याच भूमिकेत आपल्याला राहायचे आहे, असे आवाहन करीत तुम्ही आमची भूमिका समजून घ्या, आम्ही १५० वर्षांपासून आरक्षणात आहोत, पण आम्हाला हे माहिती नव्हते की आम्ही आहोत. आता आम्हाला माहिती झाले आहे, त्यामुळे नोंदी पाहून तुम्हीही म्हटले पाहिजे की द्या मराठा समाजाला आरक्षण.**

## कर्नाटक दूधसंघाची दूध दरात वाढ

**नवी दिल्लीः** देशात लोकसभा निवडणुकीनंतर निकालाच्या आधी गुजरात सहकारी दूध संघाने अमूलच्या दरात वाढ केली. त्यानंतर इतर दूध संघ दुधाच्या दरात वाढ करतील अशी शक्यता व्यक्त केली जात होती. आता कर्नाटक दूध महासंघाने दुधाच्या दरात वाढ केली आहे. संघाने दुधाच्या दरात लिटरमागे दोन रुपयांनी वाढ केल्याचे निवेदनातून म्हटले आहे.

कर्नाटक सहकारी संघाने दूध दरात वाढ करण्याची घोषणा करताना म्हटले आहे की, संघाच्या दूध दरात २ रुपयांनी वाढ करण्यात येत आहे. त्यामुळे आता कर्नाटक संघाचे दूध प्रति लिटर ४२ रुपयांऐवजी ४४ रुपयांना विकले जाणार आहे. कर्नाटक सहकारी संघ हा दक्षिण भारतातील सर्वात मोठा सहकारी दूध उत्पादक ◀◀ पान २ वर

## 'जय पॅलेस्टाईन..' खासदारकीची शपथ घेतल्यानंतर ओवैसींनी दिली घोषणा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**



अठराव्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी एआयएमआयएम प्रमुख असदुद्दीन ओवैसीं यांनी खासदारकीची शपथ घेतली. शपथ पूर्ण झाल्यानंतर त्यांनी जय पॅलेस्टाईनचा नारा दिला. शपथविधीनंतर त्यांनी प्रथम जयभीम, त्यानंतर जय मीम, जय तेलंगणा आणि जय पॅलेस्टाईन अशा घोषणा दिल्या. ओवेसी यांनी पाचव्यांदा लोकसभा सदस्य म्हणून शपथ घेतली. यावेळी ते म्हणाले की, भारतातील उपेक्षित लोकांचे प्रश्न मी प्रामाणिकपणे मांडत राहीन.

शपथविधीनंतर माध्यमांशी बोलताना ओवैसी म्हणाले की, कोण काय बोलले आणि काय नाही, सर्व काही तुमच्या समोर आहे . मी फक्त जय भीम, जय मीम, ◀◀ पान २ वर

## टायपिंग परीक्षा उत्तीर्णांना आता मिळणार अर्थसहाय्य

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या टंकलेखन आणि ऑनलाईन लघुलेखन अभ्यासक्रमासाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना अमृत या संस्थेकडून साडेसहा हजार आणि ५ हजार ३०० रूपये अर्थसहाय्य दिले जाणार आहे.**

अमृत संस्थेकडून खुल्याप्रवर्गातील ज्या जातींना कुठल्याही स्वतंत्र शासकीय विभाग, संस्था, महामंडळामार्फत समकक्ष योजनांचा लाभ मिळत नाही. अशा खुल्या प्रवर्गातील अमृतच्या लक्षीत गटातील जातींच्या, आर्थिकदृष्टया दुर्बल



घटकांतील विद्यार्थी, युवक, युवती जे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या शासकीय संगणक टंकलेखन बेसिक कोर्स प्रमाणपत्र परीक्षा व ऑनलाईन लघुलेखन ◀◀ पान २ वर

## लोकसभा अध्यक्षपदासाठी आज होणार निवडणूक

**निवी दिल्ली । वृतसंस्था**

लोकसभा अध्यक्षपदासाठी सत्ताधारी भाजप प्रणित एनडीए आघाडी आणि विरोधक इंडिया आघाडीमध्ये एकमत झाले नाही. भाजप प्रणित एनडीएने ओम बिर्ला यांना उमेदवारी दिली आहे, तर इंडिया आघाडीने काँग्रेस खासदार के सुरेश यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे आता या पदासाठी निवडणूक होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. लोकसभा अध्यक्षपदासाठी बुधवार, २६ जूनला सकाळी ११ वाजता मतदान ◀◀ पान २ वर



# शेतकरी कर्जमाफीसाठी सरकारवर दबाव

## येत्या अधिवेशनात विरोधी पक्ष सरकारची कोंडी करण्याच्या तयारीत



### » दुधाचा भाव वाढवून देण्याचीही मागणी

विविध राज्यात शेतकऱ्याच्या दुधाला ४५ रुपयापर्यंत भाव मिळत आहे. परंतु महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या दुधाला फक्त २७ रुपये भाव मिळतो. हेच दूध अमूल व इतर दूध कंपन्यांकडून ग्राहकाला ५५ ते ६० रुपये प्रतिलिटर विकले जात आहे. राज्य सरकारने तातडीने यात लक्ष घालून दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूधाचे दर वाढवून द्यावेत अन्यथा शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा पटोले यांनी सरकारला दिला.

### » काँग्रेस कर्जमाफीचा मुद्दा लावून धरणार

विधानसभेच्या शेवटच्या अधिवेशनात हा कर्जमाफीचा मुद्दा लावून धरण्याचे काँग्रेसने ठरविले आहे. २७ जूनपासून राज्य विधिमंडळाचे अधिवेशन सुरू होत असून, शिंदे सरकारनेही तेलंगणाप्रमाणे शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याची घोषणा या अधिवेशनात करावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. माकपचे एक शिष्टमंडळ सोमवारी पटोले यांना भेटले. या शिष्टमंडळानेही शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी विधिमंडळात महाविकास आघाडीने जोर लावावा, अशी मागणी काँग्रेसकडे केली.

**मुंबई । प्रतिनिधी**

**तेलंगणा राज्यातील काँग्रेस सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी केल्यानंतर आता राज्यातही महायुती सरकारवर शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत दबाव वाढू लागला आहे. येत्या अधिवेशनात विरोधी पक्ष ही मागणी लावून धरून सरकारची कोंडी करेल, अशी चिन्हे आहेत.**

तेलंगणा विधानसभेच्या निवडणुकीच्या दरम्यान काँग्रेस पक्षाने कर्जमाफी देण्याचे आश्वासन शेतकऱ्यांना दिले होते. त्यानुसार डिसेंबर २०१८ ते डिसेंबर २०२३ या काळातील २ लाखापर्यंतची शेतकऱ्यांची कर्जे माफ करण्याचा निर्णय काँग्रेस सरकारने नुकताच घेत दिलेला ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२५ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- |
| गहू : ६.०० क्विंटल | | |
| २,१६१ | २,१६१ | २,१६१ |
| ज्वारी/हायब्रिड : ७.५० क्विंटल | | |
| २,१६१ | २,७७५ | २,४०३ |
| मूग : १.०० क्विंटल | | |
| ७,२७६ | ७,५०१ | ७,३८८ |
| तूर : १४.५० क्विंटल | | |
| ८,१०० | ११,०५० | ९,९६६ |
| उडीद : ९.५० क्विंटल | | |
| २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरीः ७.५० क्विंटल | | |
| २,३८० | २,७७० | २,५३४ |
| चिंच/लोकलः ४७.०० क्विंटल | | |
| १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीनः १८७.०० क्विंटल | | |
| ४,५०० | ४,५४१ | ४,५२३ |
| हरभराः ५.०० क्विंटल | | |
| ४,३०० | ६,२०० | ५,३३३ |

# पुनर्वसित गावठाणांच्या विकासाचा मार्ग मोकळा

## गावठाण ताब्यात घेण्याचे अजित पवार यांचे निर्देश, राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीच्या बैठकीत निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याच्या विकासासाठी महत्वपूर्ण ठरलेल्या विविध प्रकल्पांतील प्रकल्पग्रस्तांसाठी उभारण्यात आलेली पुनर्वसित गावठाणे 'आहे त्या स्थितीत' ग्रामविकास विभागाने तातडीने ताब्यात घ्यावीत. या पुनर्वसित गावठाणांना पुरविण्यात येणाऱ्या १८ नागरी सुविधांसह त्यांच्या विकासासाठी आवश्यक असणारा अतिरिक्त निधी ग्रामविकास विभागाला देण्यात येईल, असा महत्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी घेतला. दरम्यान या निर्णयामुळे राज्यातील अनेक पुनर्वसित गावठाणांच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला असून गेल्या अनेक वर्षांचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागला आहे. त्याचबरोबर दरड कोसळून तसेच भूस्खलनामुळे पूर्णपणे गाडले गेलेल्या वाड्या, वस्त्या, तांडे, पाडे, गावांतील बाधितांनासुध्दा प्रकल्पग्रस्तांचा दर्जा देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, राज्याच्या विकासात विविध प्रकल्पांचे मोठे योगदान आहे. या प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी राज्यात ठिकठिकाणी पुनर्वसित गावठाणे उभारण्यात आली आहेत. मात्र अनेक पुनर्वसित गावठाणे अद्यापि ग्रामविकास विभागाकडे ◀◀ पान २ वर



## अग्रलेख

# वायू प्रदूषणाचे भिषण वास्तव !

काही वर्षांपासून वायू प्रदुषणाचा प्रकोप वाढत चालला आहे त्यामुळे माणसाला श्वास घेणे मुश्कील झाले आहे. पर्यायाने श्वास सोडावे लागत आहेत. अर्थात याला बव्हंशी माणसाचे कर्तृत्वही कारणीभूत आहे. निसर्गावर आक्रमणाचा प्रयत्न झाला की उलट तडाखा बसणारच. झपाट्याने वाढत चाललेल्या वायू प्रदुषणाचा जोर का झटका भारतासह संपूर्ण जगाला बसला आहे, बसतो आहे. भीषण वायू प्रदुषणामुळे २०२१ साली जगभरात ८१ लाख लोकांचा बळी गेला. त्यात भारतातील २१ लाख तर चीनमधील २३ लाख बळींचा समावेश आहे. अमेरिकेतील हेल्थ इफेक्ट इन्स्टिट्युटने 'युनिसेफ'सोबत या संबंधीचा अहवाल तयार केला असून तो १९ जून रोजी प्रकाशित करण्यात आला आहे. त्यानुसार २०२१ मध्ये वायू प्रदुषणामुळे भारतात ५ वर्षाखालील सुमारे १ लाख ६९ हजार मुलांचा मृत्यू झाला. त्या पाठोपाठ नायजेरिया १ लाख १४ हजार, पाकिस्तान ६८ हजार, इथियोपिया ३१ हजार, बांगला देश १९ हजार असा क्रम लागतो. दक्षिण आशियातील बहुतांश मृत्यूंसाठी उच्च रक्तदाब, चुकीचा आहार आणि तंबाखू सेवन या नंतर वायू प्रदूषण हाच घटक प्रामुख्याने कारणीभूत असल्याचे अहवालात म्हटले आहे. २०२१ मध्ये वायू प्रदुषणामुळे झालेले मृत्यू हे त्या आधीच्या कोणत्याही वर्षी झालेल्या मृत्यूंपेक्षा अधिक होते.

वायू प्रदुषणामुळे जगभरात झालेल्या एकूण मृत्यूंमध्ये ५४ टक्के वाटा हा भारत आणि चीनचा आहे. वायू प्रदुषणामुळे कर्करोगाच्या रुग्णांमध्ये हृदयरोगाचा आणि मृत्यूचा धोका वाढण्याचा इशारा अहवालात देण्यात आला आहे. २००० ते २०२३ दरम्यान ८ संशोधन अभ्यास प्रसिद्ध झाले. त्यात वायू प्रदुषणाचा हृदयविकार, स्ट्रोक आणि कर्करोग यासारख्या आजारांवर होणा-या थेट दुष्परिणामाचा अभ्यास करण्यात आला होता. अभ्यासासाठी सुमारे १ कोटी लोकांच्या आरोग्याचा आढावा घेण्यात आला होता. वायू प्रदुषणाचा व्यापक परिणाम हा हृदयाशी संबंधित आजारावर होत असतो, असे अभ्यासकांनी म्हटले आहे. भारत आणि चीन या दोन्ही देशांत एकत्रितपणे झालेल्या मृत्यूचे प्रमाण हे एकूण मृत्यूच्या ५४ टक्के आहे. दक्षिण आशियामधील पाकिस्तान सुमारे २ लाख ५६ हजार, बांगला देश २ लाख ३६ हजार, म्यानमार १ लाख १ हजार तर आग्नेय आशियातील इंडोनेशिया २ लाख २१ हजार, व्हिएतनाम ९९ हजार, फिलिपाईन्स ९८ हजार या देशांचा समावेश होतो. या शिवाय आफ्रिका खंडातील नायजेरियामध्ये २ लाख ६ हजार तर इजिप्तमध्ये १ लाख १६ हजार मृत्यू झाले आहेत. ओझोनमुळे होणारे एकूण प्रदूषण सुमारे ८१ लाख मृत्यूस कारणीभूत ठरले आहे. जगभरात वायू प्रदुषणामुळे झालेल्या एकूण मृत्यूंपैकी ९० टक्के मृत्यू हे वायू प्रदुषणामुळे झाले आहेत. वायू प्रदुषणाचा आपल्या आरोग्यावर मोठा परिणाम होतो. म्हणून हवेची गुणवत्ता आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सुधारणे अत्यंत गरजेचे आहे. नुकताच जागतिक योग दिन पाळण्यात आला. उत्तम आरोग्यासाठी योगासने कशी महत्त्वाची आहेत हे भारतातर्फे जगाला पटवून दिले जात असतानाच भारतातच याच्या विपरित परिस्थिती कशी आहे याचे चित्रही समोर आले. २०२१ मध्ये प्रदुषित हवेमुळे भारतात २१ लाख लोकांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक आकडेवारी अमेरिकेतील 'हेल्थ इफेक्ट' संस्थेने आपल्या अहवालाद्वारे मांडली. वर्षभरामध्ये जर वायू प्रदुषणामुळे इतक्या प्रचंड प्रमाणात लोक मृत्युमुखी पडत असतील तर याची कल्पना भारत सरकार आणि राज्य सरकारांना, आरोग्य विभागाला नसेल का? भारतात वायू प्रदूषण हे प्रचंड प्रमाणात आहे हे नाकारण्यास जागाच नाही. म्हणजे ज्या योगासनांचा आपण आग्रह धरतो त्याच देशात प्राणायाम करण्यासाठी शुद्ध हवा मिळत नसेल तर ही परिस्थिती अत्यंत केविलवाणीच म्हणावी लागेल.

अहवालात म्हटले आहे की, खराब हवामानामुळे भारतात रोज ४६४ किशोरवयीन मुले दगावतात. जगण्यासाठी शुद्ध हवा आवश्यक असते तीच नसेल तर बाकीच्या इतक्या गोष्टी उपलब्ध करून दिल्या अशा बढाया मारण्यात काय अर्थ? अन्न, पाणी, वस्त्र, निवारा या जगण्यासाठी मुलभूत गरजा मानल्या जातात; परंतु या गोष्टींच्या अस्तित्वासाठी शुद्ध हवा ही अधिक मुलभूत गरज ठरते. भारतात हवेतील प्रदूषण निर्माण होण्यामागे सर्वाधिक वाटा हा वाहतुकीचा आहे. सुमारे १९.६ टक्के वायू प्रदूषण हे वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे होते शिवाय रस्त्यावरच्या धुलीकणांचीही त्यात भर पडते. हे प्रमाण १९.४ टक्के आहे. औद्योगिकरणाच्या माध्यमातून १८.९ टक्क्यांची भर पडते. असाध्य रोग वाढण्यामागे वायू प्रदूषणच कारणीभूत आहे.

मधुमेह, नेत्रविकार जडण्यामागे प्रदुषित हवाच कारणीभूत असल्याचे अहवालात म्हटले आहे म्हणून सरकारने या गोष्टींकडे गांभीर्याने लक्ष द्यायला हवे. दिल्ली, मुंबई, कोलकाता, बंगळुरू ही महानगरे वायू प्रदुषणासाठी प्रसिद्ध आहेत. दिल्ली परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा जाळला जात असल्याने राजधानीतील प्रदूषण इतके वाढले की शाळांना सुटी द्यावी लागली. मास्क लावल्याशिवाय लोकांना फिरता येत नव्हते. यावरून परिस्थिती किती चिंताजनक आहे हे लक्षात येते; पण लक्षात कोण घेतो? वायू प्रदूषण हे स्लो पॉयझनिंग सारखे होत राहते. ज्या वेळी हे लक्षात येते तेव्हा वेळ निघून गेलेली असते. भारतात मोठी लोकसंख्या असल्याने मृत्युमुखी पडणा-यांचे प्रमाणही मोठे आहे. निसर्गसंपदेने समृद्ध असलेल्या भारतात प्रदुषित हवेचे जीवघेणे तांडव सुरू राहावे हे आश्चर्यकारकच म्हणावे लागेल.

# विद्यार्थ्यांनी अभ्यास व खेळ यांचे संतुलन राखून आपला छंद जोपासावा.वासुदेव सोळंके

बीड । प्रतिनिधी

**विद्यार्थ्यांनी पालक व शिक्षक यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना व केलेल्या आज्ञांचे पालन करून अभ्यास व खेळ यांचे संतुलन राखावे .याबरोबरच आपल्या आवडीचा किमान एक छंद जोपासून आपले जीवन आनंदी ठेवावे असे आवाहन जी .प .चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व वसुदेव सोळंके यांनी केले.**



क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड च्या वतीने दि.२३जुन रोजी जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने सन २०२३-२४ या वर्षी राज्य व राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धामध्ये नेत्रदीपक कामगिरी केलेल्या खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून टी-शर्टस्? वितरीत करून प्रोत्साहित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषद, बीड चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव




सोळुंके उपस्थित होते. या वेळी उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित करताना, विद्यार्थ्यांनी पालक व शिक्षक यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचना व केलेल्या आज्ञांचे पालन करून अभ्यास व खेळ यांचे संतुलन राखावे व आपल्या आवडीचा किमान एक छंद जोपासून आपले जीवन आनंदी ठेवावे असे आवाहन केले. या वेळी उपस्थित असलेले वैभव गिरी, शेख अतिख, अनिल खराडे, सुधीर हजारे, विशाल गिरी आदि क्रीडा प्रशिक्षक व खेळाडूंचे पालक यांना ऑलिम्पिक कुस्ती पटू खाशाबा जाधव यांच्या जीवन चरित्राचे पुस्तक भेट देण्यात आले. प्रारंभी जिल्हा क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले त्यानंतर विनायक वझे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन नितीन येळवे यांनी केले. जिल्ह्यातील सुमारे ७० विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला. टी-शर्टस्? वितरण कार्यक्रमानंतर शालेय विद्यार्थ्यांकडून आर्टिस्टिक्स्? जिम्नॅस्टिक्स्? व रोलर स्केटिंग या खेळांची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगेश करांडे, त्रिगुणा वाघमोडे, जितु आराक, मंगेश शिंदे यांनी परिश्रम घेतले.

# भावसार समाजाकडून विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न

## गणेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती




परळी । प्रतिनिधी

**भावसार युवा सेवाभावी संस्था परळच्या वतीने येथील श्रद्धा मंगल कार्यालयात दि २३ जून रोजी गुणवंतांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता या प्रसंगी दहावी, बारावी तसेच इतर विविध परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंतांचा सत्कार उत्साहात संपन्न झाला.**

कुलदैवत हिंगलाज माता आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी भावसार युवासेवा भावी संस्थेचे अध्यक्ष विलास सुत्रावे यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख मार्गदर्शक गणेश शिंदे यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या मधील विविध क्षमता ओळखल्या पाहिजेत, स्वतःमधील वेगळेपण शोधून त्या क्षमतांचा विकास करून जीवनात यश मिळवले पाहिजे असे सांगितले. रुळलेल्या आणि मळलेल्या वाटांवरून सर्वच जण चालतात परंतु स्वतःचा मार्ग स्वतः तयार करणे फार कमी लोकांना जमते, आपणही आपल्या यशाचा मार्ग स्वतः तयार करणे गरजेचे आहे असे ते म्हणाले. आज आईच्या स्पर्शाची जागा मोबाईलने घेतली आहे. आपल्या सर्वच भावना आम्ही सोशल मीडियावर व्हर्चुअल पद्धतीने मांडत आहोत, इथेच विज्ञान जिंकले आणि प्रेम हरले असे म्हणावे लागते असे सांगून, मुलांना जवळ घेऊन, त्यांना प्रत्यक्ष प्रेम देऊन त्यांचे संगोपन करा असे गणेश शिंदे यांनी पालकांना सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर येथील हायकोर्टातील प्रसिद्ध विधीज्ञ एडवोकेट सुनील काकडे हे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये माहेश्वरी महिला मंडळ परळीच्या अध्यक्षा सौ. दीपाताई बंग, भावसार समाजाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश कानगावकर, भावसार समाज परळीचे अध्यक्ष प्रभाकर हजारे, महिला अध्यक्ष सौ. सारिकाताई तांदळे आणि प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुण्याचे सुप्रसिद्ध व्याख्याते गणेश शिंदे हे उपस्थित होते. सौ दीपाताई बंग यांनी समाजातील मुलींनी शिक्षण घेऊन प्रगती करावी मात्र अवास्तव अपेक्षा बाळगून आयुष्य कठीण करू नये, त्याऐवजी काही प्रसंगी तडजोडी स्वीकारून आयुष्य सुंदर करता येते हे अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. परळीतील भावसार समाजाची समाजाची पहिली महिला एम बी बी एस एम.डी. डॉक्टर पूजा बंडू हजारे व डॉक्टर अश्विनी अनिल सुत्रावे, बी ए एम एस यांची पण विशेष उपस्थिती याप्रसंगी होती. त्यांचा भावसार युवा सेवाभावी संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. डॉक्टर पूजा हजारे व डॉक्टर अश्विनी सुत्रावे यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. भावसार युवा सेवाभावी संस्था दरवर्षी सत्कार गुणवंतांचा, सन्मान सामाजिक कार्याचा, आधार गरजवंतांचा ही थीम घेऊन कार्यक्रम आयोजित करत असते. यातीलच सन्मान सामाजिक कार्याचा या उपक्रमा अंतर्गत श्रीराम जन्मभूमी मध्ये रामालल्ला च्या मूर्ती प्राणप्रतिष्ठेच्या आनंद उत्सव प्रसंगी परळी येथे भव्य शोभायात्रा काढल्याबद्दल लोकोत्सव समिती, परळी यांचा सन्मानपत्र, हिंगलाज मातेची प्रतिमा व रोपटे देऊन सत्कार करण्यात आला. या सत्कारास भास्कर मामा चाटे यांनी उत्तर दिले व भावसार युवा सेवाभावी संस्थेचे आभार मानले तसेच आधार गरजवंतांचा या उपक्रमांतर्गत सौ अपसिंगेकर यांना भावसार युवा सेवाभावी संस्थेमार्फत शिलाई मशीन देण्यात आली. एडवोकेट सुनील काकडे यांनी अध्यक्षीय समारोप केला तर प्रसाद गरुड यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमास परळीतील सर्व स्तरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय सुरवसे व तानाजी देशमुख यांनी त्यांच्या नेहमीच्या शैलीत अतिशय भारदार पद्धतीने केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गोपाळ कंकाळ, शैलेश वैजवाडे,अजिंक्य गरुड, दत्ता बुलबुले, जय हंबीरे, प्रमोद पाखरे, कृष्णा बेदरकर, मनोज वायचळे, गोविंद खपले, कृष्णा बरडे, अभिषेक वळसे, रवींद्र यलशेटे,कृष्णा न बेदरकर व भावसार युवा सेवाभावी संस्थेच्या सर्वच सदस्यांनी अतोनात परिश्रम घेतले.

# मुस्लिम समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या टाटा इन्स्टिट्यूटला शासनाकडून आदेश नसल्याने सर्व्हेक्षणाचे काम रखडले-जे.डी.शाह

बीड । प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य हे वंचितांसाठी आरक्षणाची तरतूद करणारे अग्रेसर राज्य आहे आणि नागरिकांचे. मागासवर्ग यांमधील लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थिती चांगली करण्यासाठी महाराष्ट्र राज्य संपुर्ण देशात ओळखले जात असताना जवळपास दोन वर्ष उलटले तरी राज्य सरकारने मुस्लीम समाजाच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा सर्व्हेक्षण करुन अहवाल तयार करण्यासाठी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस मुंबई ला कार्यादेश जारी केले नसल्याने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार देवेंद्र फडणवीस तसेच अल्पसंख्याक विकास मंत्री अब्दुल सत्तार साहेब यांना निवेदन पत्र लिहून टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसला तातडीने कार्यादेश देऊन मराठा -ओबीसी आरक्षण आंदोलनाची- त्रीवता पहाता मुस्लिम समाजाच्या सहनशीलतेची दखल घेऊन न्यायालयाच्या निर्देशानुसार ५ टक्के शैक्षणिक आरक्षण लागू करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते जे.डी.शाह यांनी ईमेलद्वारे केली आहे.**

ई -मेलद्वारे पाठविण्यात आलेल्या निवेदनाच्या माध्यमातून मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री आणि अल्पसंख्याक मंत्री यांच्या निदर्शनास आणून दिले की राज्य सरकारच्या अल्पसंख्याक विकास विभागाने सन २१-२०२२ रोजी एक सरकारी ठरावा द्वारे शासन निर्णय) जारी करून टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस मार्फत मुस्लिम समाजातील शैक्षणिक व आर्थिक स्थितीवर अभ्यास करण्यासाठी नियुक्त केले होते आणि त्यासाठी ३३ लाख रुपये मंजूर केले होते. मात्र, दोन वर्षे उलटून देखील संबंधित संस्थेला महाराष्ट्र राज्य सरकारने लेखी आदेश दिलेले नसल्याने सर्व्हेक्षणाचे काम रखडले आहे. त्यामुळे मुस्लिमांच्या हक्काच्या पाच टक्के आरक्षण लागू होऊ शकले नाही. याला मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांचा बेजबाबदार पणा कारणीभूत आहे असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. पत्रात शेवटी म्हटले आहे की कारण यापूर्वी महमूद-उर-रहमान समितीच्या अहवालानंतर २०१३ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी देखील राज्यातील मुस्लिमांच्या स्थितीचा अभ्यासासाठी सरकारने ३३. ९ लाख रुपयांचे तरतूद करून सर्व्हेक्षणानुसार. गेल्या काही वर्षांत मुस्लिमांना सरकारी योजनांचा फायदा झाला का, याचा अभ्यास करण्यासाठी सरकारने राज्यातील मुस्लिम समाजासाठी राज्य सरकारने केलेल्या प्रयत्नांचा पाहणी अहवाल टिआयएसएस ला सादर करण्याचा सरकारी ठराव जारी केला होता. त्यानुसार सदर संस्था राज्यात पुन्हा मुस्लिम बहुसंख्य लोकसंख्या बीड जिल्ह्यातीसह असलेल्या ५६ भागात अभ्यास करेल. मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करून महाराष्ट्र राज्यातील मुस्लिम समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे या अभ्यासाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते.या अभ्यास गटाद्वारे विकासाच्या विविध क्षेत्रांमध्ये मुस्लिमांचा सहभाग वाढवण्यासाठी उपाय सुचवेल. डॉ.महमूद-उर-रहमान समितीनंतर मुस्लिम समाजाचा हा पहिला राज्यव्यापी अभ्यास ठरले असते. कारण यापूर्वी महाराष्ट्रातील मुस्लिमांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी एक समिती स्थापन केली होती. त्याला एका निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी पाच वर्षे लागलेल्या या समितीने महाराष्ट्रातील मुस्लिमांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचे विदारक चित्र मांडले होते. २०१३ मध्ये सादर केलेल्या अहवालात असे म्हटले होते की महाराष्ट्रात सुमारे ६० टक्के मुस्लिम दारिद्र्यरेषेखाली आहेत. सरकारी नोकऱ्यांमध्ये मुस्लिमांचा वाटा फक्त ४.४ टक्के होता आणि समाजातील एकूण पदवीधरांची संख्या केवळ २.२ टक्के होती. समितीने अहवालात शिक्षण आणि सार्वजनिक आणि खाजगी अशा आठ टक्के आरक्षणाची शिफारस केली आणि समाजातील एका मोठ्या वर्गाचे दुःख दूर करण्यासाठी आरक्षणाची शिफारस आवश्यक असल्याचे सांगितले होते. रहमान समितीच्या अहवालावर आधारित, तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारने २०१४ मध्ये सरकारी शाळा, महाविद्यालये आणि नोकऱ्यांमध्ये मुस्लिमांसाठी पाच टक्के आरक्षण जाहीर केले होते. या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. मुंबई उच्च न्यायालयाने १४ नोव्हेंबर रोजी दिलेल्या निकालात नोकऱ्यांमधील पाच टक्के आरक्षणाचे कलम हटवले पण मुस्लिमांना शिक्षणात पाच टक्के आरक्षण द्यावे, असे म्हटले आहे. २०१४ मध्ये सत्तेवर आलेल्या भाजप -शिवसेना सरकारने धर्माच्या आधारावर आरक्षणाला समर्थन देत नसल्याचे सांगत आरक्षणाची

## पान १वरून...

### तुम्ही पलट्या मारल्या

सगळा समाज आपला आहे, अंतरवलीच्या आजूबाजूला जे गावं आहेत, ते आपले शिव भाऊ आहेत. आपली घडी विस्कळीत होऊ देऊ नका, तो येवल्याहून आला तो भांडण लावेल, दंगली करेल आणि निघून जाईल, असे म्हणत जरांगे यांनी छगन भुजबळ यांना पुन्हा लक्ष्य केले. गाव खेड्यातील ओबीसी मराठा एक आहे, मराठ्यांनी छगन भुजबळ यांचे दंगली घडवण्याचे स्वप्न पूर्ण होऊ द्यायचे नाही. छगन भुजबळ, छगन भाऊ तुझा असा इंगा जिरवतो, बेट्या, तुझा टांगा उलटवणार. तू जेवढे करशील तेवढे मराठे एक होत आहेत, असे म्हणत जरांगे यांनी भुजबळांवर पुन्हा एकदा बोचरी टीका केली. आंदोलन संपेपर्यंत थांबा, नंतर पाहुयात. आपण स्थगित केलेले आंदोलन त्याला परवानगी नाकारली, पण त्यांच्या आंदोलनास परवागी दिली. हा जातीवाद नाही का, असा सवालही मनोज जरांगे यांनी विचारला आहे.

-----------

### नीट पेपरफुटी प्रकरणी संजय

अभियोक्ता अ‍ॅड. रागिणी चव्हाण यांनी केला. आरोपी संजय जाधव यांचे वकील अ‍ॅड. श्रीकांत बोराडे यांनी संजय जाधव यांची चौकशी यापूर्वी पोलिसांनी केली आहे. त्यामुळे कमीत कमी पोलिस कोठडी द्यावी, अशी विनंती केली. दोन्ही बाजू ऐकल्यानंतर न्या. चव्हाण यांनी आरोपी संजय जाधव यास २ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

-------

### पुनर्वसित गावठाणांच्या विकासाचा

हस्तांतरित झाली नसल्याने त्यांच्या विकासासाठी निधीची तरतुद करण्यात अडचणी येतात, त्यामुळे त्यांचा विकास रखडतो. ही बाब लक्षात घेऊन ग्रामविकास विभागाने राज्यातील सर्व पुनर्वसित गावठाणे 'आहे त्या स्थितीत' त्यांच्या ताब्यात घ्यावीत. या गावठाणांना १८ नागरी सुविधांसह विकासकामांसाठी अतिरिक्त निधी देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला.

**रिक्त असलेले भूखंड संबंधित प्रकल्पातील बाधितांना द्या**

अजित पवार म्हणाले की, पुनर्वसित गावठाणात अनेक वर्षापासून वाटपाविना रिक्त असलेले भूखंड संबंधित प्रकल्पातील बाधितांना द्यावेत, त्यानंतर सदर जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांना द्यावेत, त्यानंतरही शिल्लक राहिले तर राज्यातील इतर प्रकल्पग्रस्तांना या प्राधान्य क्रमानुसार देण्यात यावेत, अथवा कोणी हे भूखंड घ्यायला तयार नसतील तर नियमाप्रमाणे त्यांचे लिलाव करावेत, असे निर्देशही यावेळी दिले.

**धारूर तालुक्यातील सुकळी प्रकल्पग्रस्तांचे खास बाब म्हणून पुनर्वसन**

बीड जिल्ह्यातील गुणवंती पाटबंधारे प्रकल्पातील सुकळी (ता.धारूर) येथील प्रकल्पग्रस्तांचे खास बाब म्हणून पुनर्वसन तसेच यवतमाळ जिल्ह्यातील अमडापूर लघू पाटबंधारे प्रकल्पातील कुरळी व घामापूर (ता.उमरखेड) गावातील पात्र प्रकल्पग्रस्त कुटूंबाचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव मंत्रीमंडळ बैठकीत सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

---------

### पवार यांच्या उपस्थितीत

त्यामुळे त्या पुन्हा येतील हा विश्वास होता, अतिशय योग्य वेळी त्यांनी आता निर्णय घेतला आहे. सामाजिक ऐक्य टिकवण्याचे आपल्यासमोर आव्हान आहे. मराठवाड्यात आपल्याला जे चित्र बघायचेय त्यात त्यांचा हातभार लागेल असा विश्वासही यावेळी त्यांनी व्यक्त केला. जयंत पाटील म्हणाले की, सुर्यकांता यांचा आजचा पक्षप्रवेश मोठ्या प्रमाणात करायचा होता. परंतु शरद पवार अधिवेशनाकरिता दिल्लीला जाणार आहे. म्हणून हा छोटेखाणी पक्षप्रवेश कार्यक्रम करण्यात आला आहे.

------------

### लोकसभा अध्यक्षपदासाठी

होणार आहे. माध्यमांशी बोलताना राहुल गांधी म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधी पक्षांनी सरकारला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे. राजनाथ सिंह यांनी मल्लिकार्जुन खर्गे यांना फोन करून लोकसभा अध्यक्षपदासाठी पाठिंबा देण्यास सांगितले. आम्ही राजनाथ सिंह यांना सांगितले आहे की, आम्ही त्याच्या लोकसभा अध्यक्ष पदाच्या उमेदवाराला पाठिंबा देऊ; पण लोकसभा उपाध्यक्ष पद विरोधकांकडे गेले पाहिजे. मात्र भाजपाने हे मान्य न केल्याने निवडणूक होत आहे. भाजप खासदार ओम बिर्ला यांना एनडीएने उमेदवारी दिली आहे. बिर्ला यांनी सभापतीपदाची निवडणूक जिंकली तर ते भारतीय लोकसभेच्या इतिहासात सलग दोन वेळा सभापती होणारे एकमेव खासदार ठरतील.

-----------

### टायपिंग परीक्षा उत्तीर्णांना

परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य मिळणार आहे. प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा केले जाणार आहे. अमृत संस्थेच्या संकेतस्थळ ु. ारहरर्ीीिं. ैस. ळप व महाराष्ट्र शिक्षण परिषदेचे संकेतस्थळ ु.ीलशर्ीपिश.ळप या संकेतस्थळावर अर्ज करावे लागणार आहेत.

--------

### 'जय पॅलेस्टाईन..' खासदारकीची

जय तेलंगणा, जय पॅलेस्टाईन असं म्हटलं आहे. हे विरोधात कसे आहे, मी बोललो ते घटनेच्या विरोधात आहे तर घटनेतील तरतुदी दाखवा, असे आव्हानही त्यांनी विरोधी पक्षांच्या सदस्यांना दिले. लोकसभेत ओवेसी यांनी केलेल्या घोषणाबाजीला भाजप नेते जी किशन रेड्डी यांनी तीव्र विरोध केला. ते रेकॉर्डमधून काढून टाकण्याची मागणीही त्यांनी केली. यावर ओवेसी म्हणाले की, ते (जी किशन रेड्डी) विरोध करतात, हे त्यांचे काम आहे. आम्हाला जे म्हणायचे होते ते आम्ही बोललो. त्यांना खूश करण्यासाठी आपण काहीही का बोलू? असा सवाली त्यांनी केला. दरम्यान, भाजप नेते जी किशन रेड्डी म्हणाले की, देशाच्या संसदेत शपथ घेताना जय पॅलेस्टाईन असा नारा देणे पूर्णपणे चुकीचा आहे. एकीकडे ते (ओवेसी) भारतीय राज्यघटनेबद्दल बोलतात आणि दुसरीकडे भारतीय राज्यघटनेच्या विरोधात घोषणा देतात. भारतात राहून पॅलेस्टाईनच्या समर्थनात भूमिका घेणे पूर्णपणे चुकीचे आहे. अशा घटनांमुळे या लोकांचा खरा चेहरा समोर येतो. हे लोक रोज प्रत्येक विषयावर असे प्रकार करतात. लोकसभेत अशा घोषणा देणाऱ्यांची ओळख पटवावी, अशी मी जनतेला विनंती करतो, असेही आवाहनही त्यांनी केले.

-------------

### शेतकरी कर्जमाफीसाठी

शब्द खरा करून दाखवला. आता केंद्र किंवा राज्य सरकार अशी कर्जमाफी करणार का, याकडे आता शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. लोकसभा निवडणुकीनंतर पुन्हा जनतेत लोकप्रिय होण्यासाठी काय करावे, याबाबत महायुतीच्या नेत्यांमध्ये चिंतन सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबतचे सल्लेही सरकारला त्यांचे नेते व कार्यकर्त्यांकडून दिले जात आहेत.

------------

### कर्नाटक दूधसंघाची

संघ आहे. हा दूध संघ कर्नाटक सरकारच्या सहकार मंत्रालयाच्या माध्यमातून चालवला जातो. कर्नाटक सहकारी संघाच्या १२ हजाराहून अधिक दुग्ध सहकारी संस्था कार्यरत असून, २२.५ लाखांहून अधिक दूध उत्पादक संघाशी जोडले गेले आहेत. तर दूध, दही, तूप, लोणी, आईस्क्रीम, चॉकलेट्स आणि मिठाई या पदार्थांची विक्री नंदिनी या ब्रँडने संघाकडून केली जाते. सध्या संघ ९८.१७ लाख लिटर दुधाच्या खरेदी करतो. तर लवकरच एक कोटी लिटरचा आकडा संघ पार करेल.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. २६ जून २०२४


## स्व.विनायक मेटे यांच्या जयंती निमित्त मालीपारगावात शालेय साहित्य व किराणाचे वाटप

माजलगाव : लोकनेते मा. आ. स्व. विनायक मेटे यांच्या जयंतीनिमीत्त माजलगाव शिवसंग्रामच्या वतीने तालुक्यातील मालीपारगाव येथे शालेय विद्यार्थ्यांना साहित्य व गरजुंना किराणा किटचे वाटप दि. २६ जुन रोजी सकाळी १० वाजता करण्यात येणार असुन या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवसंग्रामचे तालुकाध्यक्ष उत्तम पवार, तालुका उपाध्यक्ष बबनराव पालकर, अक्षय शिंदे यांनी केले आहे. साहित्य वाटप डॉ. ज्योतिताई विनायकराव मेटे यांच्या शुभहस्ते तर प्रमुख पाहुणे म्हणुन जिल्हाध्यक्ष नारायण काशिद, जेष्ठ नेते प्रभाकर आप्पा कोलंगडे, अनिल घुमरे, सुहास पाटील, प्रा. दत्तात्रय वाळसकर हे उपस्थित असणार आहेत. स्व. विनायक मेटे यांच्या जयंतीनिमीत्त जिल्हाभरात विवीध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले असुन त्याचाच एक भाग म्हणुन माजलगाव तालुक्यातील मालीपारगाव येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गरजुंना किराणा किटचे वाटप करण्यात येणार असुन या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवसंग्रामचे तालुकाध्यक्ष उत्तम पवार, तालुका उपाध्यक्ष बबनराव पालकर, अक्षय शिंदे यांनी केले आहे.

# योगेश्वरी देवल कमिटीवरील नवीन विश्वस्त मंडळाविषयी भाविकात तीव्र संतापाची लाट

## निवडीच्या विरोधात न्यायालयात दाद मागण्याचा भाविकांचा निर्णय ; सर्व पक्षीय समितीच्या वतीने फुंकल्या गेले आंदोलनाचे रणशिंग

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

योगेश्वरी देवल कमेटीवर बीड येथील सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी नियुक्त केलेल्या नवीन विश्वस्त मंडळा विषयी भाविकात तीव्र संतापाची लाट उसळली असुन या निवडीच्या विरोधात न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय असंख्य भाविकांनी घेतला आसून काल शहरातील सर्व पक्षिय समितीच्या वतीने योगेश्वरी देवीची महा आरती करून आंदोलनाचे रणशिंग फुंकल्या गेले.

संपूर्ण महाराष्ट्राची कुलस्वामिनी असलेल्या अंबाजोगाईच्या श्री योगेश्वरी देवीच्या विश्वस्त मंडळाची मुदत संपल्या मुळे नवीन विश्वस्त मंडळ भावीका मधून निवड करण्याचे आदेश मा. न्यायालयाने बीड येथील सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांना दिले. या आदेशानुसार विश्वस्त नियुक्त करण्या साठी सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी अंबाजोगाई शहरातील स्थानिक रहवासी आसलेल्या भक्तांना विविध निकष लावून अर्ज मागवले. त्यामुळे एकूण १११० भक्तांनी अर्ज दाखल केले होते अर्ज दाखल केलेल्या पैकी २३७ अर्ज सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी त्रुटीमध्ये काढल्याने ८७३ भक्तांनी दररोज ४० या प्रमाणे बीड येथील सहाय्यक धर्मदाय आयुक्त कार्यालयात ३५० च्या जवळपास भक्तांनी बीड येथे जाऊन मुलाखती दिल्या.

घेण्यात आलेल्या या मुलाखती ईन कॅमेरा न घेतल्या गेल्याने निवड करण्यात आलेल्या विश्वस्त महोदयांनी आशा कोणत्या बहारदार मुलाखती दिल्या या विषयी भविकात शंका उपस्थित होत आहे. आता योगेश्वरी देवस्थानला नवीन विश्वस्त येणार, श्री योगेश्वरी देवीची महती साता समुद्रापार जाणार आणि देवस्थानचा जोमाने जीर्णोद्धार होणार या दिव्य स्वप्नात अंबाजोगाईकर असतानाच नव्याने निवड झालेल्या १६ विश्वस्तांची यादी लिक झाली आणि सोशल मीडिया मुळे वाऱ्या सारखी पसरली. बाहेर आलेली यादी पाहून अंबाजोगाई शहरवासीयां मध्ये तीव्र संतापाची लाट उसळली व सर्वत्र एकच चर्चेचा विषय झाला आणि तो म्हणजे योगेश्वरी देवीचे विश्वस्त मंडळ. ही यादी पाहून अनेकांनी ''विश्वस्त म्हणून शहरातील गोरगरीब भक्तांची नियुक्ती केल्या बद्दल निरीक्षक महोदय खुप खुप धन्यवाद '' अशी उपहासात्मक टीकाही केली. निवड केलेल्या १६ विश्वस्ता पैकी ४ ते ५ विश्वस्त हे अंबाजोगाई शहरा बाहेरील असून त्यांचे अन्य गावाच्या मतदान यादी मध्ये नावे आहेत. यादीतील शिरीष पांडे व पृथ्वीराज साठे वगळता अन्य १३ विश्वस्त वर्षातून एक वेळेस तरी देवीच्या दर्शनासाठी येतात की नाही या बद्दल नागरिकांतून सवाल उपस्थित करण्यात



आलेला असून श्रीराम देशपांडे हे या विश्वस्त मंडळा मध्ये मागील ४० वर्षा पासून कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. विश्वस्त म्हणून नवीन नियुक्ती देताना मागील १६ पैकी १० जणांना कमी करण्यात आलेले असून या मध्ये मंदिराच्या मुख्य पुजाऱ्याचाही समावेश आहे तर नव्याने निवड झालेल्या विश्वस्ता मध्ये आजी व माजी आमदार, माजी नगराध्यक्ष, एक न्यायालयीन तक्रारदार यांच्या सह एकाच व्यक्तीच्या गोतवळ्या मधील १० जणांचा समावेश आहे. नव्याने निवड करण्यात आलेल्या विश्वस्ता मध्ये योगेश्वरी देवीशी निगडित पारंपरिक सेवा करणारा पुजारी, पौरोहित्य करणारा पुरोहित, पालखी उचलणारा भोयी, नवरात्र व अन्य उत्सवात सेवा देणारा कलावंत, गोंधळी, सेवेत असणंऱ्या बारा बलुतेदारा पैकी एक, मागासवर्गीया पैकी एक यांच्या सारख्या व्यक्तीचा समावेश असता तर कोणीही यादीवर आक्षेप नोंदवला नसता अशी चर्चा शहर परिसरात सुरू आहे.

निवड करण्यात आलेल्या विश्वस्ता वरून लोकांच्या तोंडात जो सूर घुमत आहे तो, ''झन झन की सुनो झनकार

ये दुनया है काला बाजार

निवडण्यात आलेल्या विश्वस्तांच्या अर्ज क्रमांकाची सिरीज पाहिली तर लक्षात येते की २४१, २४२, २४३, २४७, ३१८, ३१९, ३५०, ३५१ हा काय ८७३ अर्जदारा पैकी निव्वळ योगायोग समजावा का असेही बोलल्या जात आहे. सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांना सारं काही ठरवून करायचंच होत तर शेकडो अर्जदार भक्तांना बीडला बोलावून मुलाखतीचा फार्स कशासाठी केला? बीडला येण्यासाठी या भक्तांना हजारो रुपयांना खड्डयात कशासाठी घातलं गेलं ? असे अनेक विध सवाल सोशल मीडिया मधून उपस्थित केल्या जात आहेत.

एकूणच सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी नियुक्त केलेल्या या नवीन विश्वस्त मंडळा विषयी भाविकात तीव्र संतापाची लाट उसळली असुन या निवडीच्या विरोधात न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय असंख्य भाविकांनी घेतला आहे.

### सर्व पक्षीय समितीने फुंकले आंदोलनाचे रणशिंग

दरम्यान सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी केलेल्या निवडीच्या विरोधात काल अंबाजोगाई शहरातील सर्व पक्षीय समितीच्या वतीने सर्व प्रथम श्री योगेश्वरी देवीची महा आरती करण्यात आली व त्या नंतर मंदीरा बाहेर येऊन सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांच्या विरोधात निषेधाच्या घोषणा देऊन आंदोलनाचे रणशिंग फुंकण्यात आले. या वेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते दिलीप दादा सांगळे, माकपचे कॉ बब्रुवान पोटभरे, लोकजनशक्ती पार्टीचे राजेश वाव्हळे, शिवसेना उबाठा गटाचे तालुका प्रमुख बालासाहेब शेप, शहर अध्यक्ष अशोक हेडे, अशोक गाढवे, बाबा भिसे, भीमराव सरवदे, श्रीपाद डांगे, अनंत अरसुडे, संजय गंभीरे बाळासाहेब वाघाळकर, बालाजी चाटे, मनोज वाघमारे, सूरज वाघमारे, डॉ नयना सिरसाट, रेखा घोबाळे, सुनीता जाधव, जयश्री पिंपरे, जयश्री मोरे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## बँकेत माहिती अधिकार कायद्यातील मार्गदर्शक सूचनांचे फलक लावा : मिलिंद सरपते

**बीड । प्रतिनिधी**

बँकांच्या कार्यालयातील कायदेशीर मार्गाने चाललेल्या पारदर्शक कामकाजाची माहिती बँकेच्या खातेदारांना तसेच सर्वसामान्य नागरीकांना सहज पाहता यावी किंवा लिखीत स्वरूपात मिळावी या करीता केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ लागु करण्यात आला आहे. परंतु सदर बँका याची अंमलबजावणी करताना दिसत नाही. काही बँकांकडून केंद्रीय माहिती अधिकार अधिनियमाचे उल्लंघन करताना दिसत आहे. या यासंदर्भात निवेदन सामाजिक कार्यकर्ते मिलिंद सरपते यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी केली आहे.केंद्रीय अधिकार अधिनियम २००५ कायद्यातील तरतुदीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सुचनांचे फलक बॅनर आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व बँकेच्या कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात यावे. आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व बँकांच्या कार्यालयातील कायदेशीर मार्गाने चाललेल्या पारदर्शक कामकाजाची माहिती बँकेच्या खातेदारांना तसेच सर्वसामान्य नागरीकांना सहज पाहता यावी किंवा लिखीत स्वरूपात मिळावी या करीता केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ लागु करण्यात आला आहे. परंतु सदरचा कायदा अस्तित्वात आल्यापासून आज अखेरपर्यंत आपल्या क्षेत्रातील कोणत्याही बँकांच्या कार्यालयात सदर कायद्याची अंमलबजावणी माहिती झाल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येत नाही. हे केंद्रीय माहिती अधिकार कायद्याचे उल्लघन असुन, सदर कायद्याची अवहेलना आपल्या कार्यक्षेत्रातील सर्वच बँकांनी केल्याचे दिसून येत आहे. तरी कायद्यातील तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सुचनांचे तसेच आपल्या कार्यक्षेत्रातील बँकांचे मा.जनमाहिती अधिकारी तथा त्या बँकांच्या अधिकारी त्यांचे नाव, पद, मोबाईल नंबर, संपूर्ण पत्त्यासह तसेच प्रथम अपिलीय अधिकारी . तथा बँकेचे वरिष्ठ अधिकारी अधिकारी त्यांचे नाव, पद, मोबाईल नंबर, संपूर्ण पत्त्यासह फलक / बॅनर आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व बँकांच्या दर्शनी भागातील भिंतीवर ठळक अक्षरात लावण्याचे आदेश त्वरीत करण्यात यावेत जेणे करून बँकेच्या खातेदारांमध्ये तसेच सर्वसामान्य नागरीकांमध्ये केंद्रीय माहिती अधिकार २००५ या कायद्याचा प्रचार व प्रसार होण्यास मदत होईल. असे मिलिंद सरपते यांनी पत्रात म्हंटले आहे.अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे सामाजिक तथा वंचितचे मिलिंद सरपते यांनी निवेदनाद्वारे केली आहे




**बीड : लोकनेते स्व.आ. विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्ताने शिवसंग्रामचे शहराध्यक्ष सुहास पाटील आयोजीत डॉ.ज्योतीताई मेटे यांच्या उपस्थितीत विश्वेश्वर कॉलनी, एकनाथ नगर, भक्ती कन्स्ट्रक्शन बीड येथे वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी शिवसंग्रामचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते व या भागातील प्रतिष्ठीत नागरिक व महिला उपस्थित होत्या.**

## किल्ले धारूरच्या आरुष प्रोॲक्टिव्ह अबॅकसला बेस्ट सेंटर पुरस्कार

### मैथिली तोडकर ला मॅथ मॅजिशियन ऑफ द डे हा मानाचा अवार्ड

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

किल्लेधारूर सह परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून शैक्षणिक क्षेत्रात आरुष प्रोॲक्टिव्ह अबॅकस क्लासेस हे नाव परिचित आहे या च परिचित असणाऱ्या क्लासेस ने काल बीड येथे झालेल्या व प्रोॲक्टिव्ह अबॅकस ने आयोजित केलेल्या नॅशनल समर कॉम्पिटिशन-२०२४ मध्ये किल्लेधारूर येथील आरुष प्रोॲक्टिव्ह अबॅकस ने बेस्ट सेंटर अवार्ड मिळवला आहे व प्रोॲक्टिव्ह अबॅकस नॅशनल कॉम्पिटिशन-२०२४ मधे ८०० विद्यार्थ्यां मधून ४ मिनिटात १०० गणिते सोडऊन कालचा मॅथ-मॅजिशियन ऑफ द डे हा अवार्ड मानाचा पुरस्कार आरुष प्रोॲक्टिव्ह अबॅकस ची विद्यार्थिनी कु.मैथिली शशिकांत तोडकर हिने मिळवला आहे.




किल्लेधारूर व आवरगाव येथे अशा दोन शाखा असणाऱ्या आरुष प्रोॲक्टिव्ह अबॅकस ने दोन मानाचे पुरस्कार प्राप्त केले आहेत त्यात एक बेस्ट सेंटर अवार्ड व दुसरा मॅथ मॅजिशियन ऑफ द डे हा मानाचा पुरस्कार कू.मैथिली शशिकांत तोडकर हिने मिळवला आहे त्याचबरोबर

कू.समृद्धी रत्नाकर डोंगरे दुसरी क्लास मध्ये प्रथम क्रमांक,कू.स्वरा सोमनाथ राजमाने दुसरी क्लास मधून द्वितीय क्रमांक,चि.सुदर्शन हनुमंत लांब तिसरी मधून प्रथम क्रमांक,चि.समृद्ध गोविंद सोळंके पहिली क्लास मधून दुसरा,चि.पृथ्वीराज लालासाहेब जगताप चौथी क्लास मधून दुसरा क्रमांक,कू.अस्मिता समाधान नखाते तिसरी क्लास मधून दुसरा क्रमांक

कू.सानवी अशोक नखाते पहिली मधून तृतीय क्रमांक,कू.सिद्धी सुशील नखाते चौथी क्लास मधून तिसरा क्रमांक

कू.स्नेहल अशोक पवार तिसरी क्लास मधून चौथा क्रमांक,कू.मयुरी नितीन पाटोळे सिनियर के.जी.मधून चौथा क्रमांक,कू.स्वरा महारुद्र इंगळे दुसरी क्लास मधून चौथा क्रमांक,चि.सोहम रमेश बांगर पाचवी क्लास मधून चौथा क्रमांक,कू.समृद्धी पुष्पराज जगताप चौथा क्रमांक,चि शार्दुल दत्तात्र्यय सोळंके तिसरी क्लास मधून पाचवा क्रमांक आहे अनुक्रमे क्रमांक मिळवलल्या सर्व विद्यार्थ्यांचे व प्रोऍक्टिव्ह अबॅकस समर कॉम्पिटिशन २०२४ मधे सहभागी झालेल्या आरुष प्रोॲक्टिव्ह अबॅकस धारूर व आवरगाव येथील सर्व विद्यार्थ्यांचे आरुष प्रोॲक्टिव्ह अबॅकस चे संचालक प्रा.अविनाश जगताप, संचालिका सौ.शीतल अविनाश जगताप, यांच्या सह पालकांनी व पंचक्रोशीतील शिक्षणप्रेमीनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या.

## पान ६ वरून...

### वडवणी कृषी उत्पन्न

भारतदादा जगताप, सर्जेराव आळणे, अँड आनंदराव काळे,सचिन लंगडे,रुक्मांगद शेंडगे,लखन महागोविंद,

शेख समशेर ,संतोष पवार, गुरुप्रसाद माळवदे, नारायणराव शिंदे, अनंतराव शेळके, बजरंग सावळे ,अंगदराव घुगे, युवा नेते संदीप शिंदे ,बंटी शिंदे सह बाजार समितीची सर्व संचालक उपस्थित होते.यावेळी सहाय्यक नसेच सहाय्यक निबंधक सहकारी संस्था वडवणीचे नेहरकर साहेब, जगदाळे साहेब, वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव गोविंदराव आंधळे,सस्ते सह बाजार समितीचे कर्मचारी उपस्थित होते.

### बीएलओव्दारे घरोघरी भेट

असतील. दिनांक दि. २५/०७/२०२४ ते ०९/०८/२०२४ या कालावधीत मतदाराचे प्राप्त दावे व हरकती दि. १९/०८/२०२४ पर्यत निकाली काढण्यात येणार आहेत .व त्यानंतर दि. २०/०८/२०२४ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द होईल.सर्व मतदारांच्या मतदार यादीतील नोंदी अचुक होऊन मतदार यादी शुध्द होण्यासाठी आणि सदर कालावधीत अधिकाधिक नाव नोंदणी, वगळणी व दुरूस्ती करण्यासाठी सर्व मतदारांनी सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे तर्फे करण्यात आले आहे.

### मराठा आरक्षणासाठी तरुणानं

उपयोग झाला नाही त्यामुळे मी माझे जीवन संपत आहे असा उल्लेख चिठ्ठीमध्ये आहे. भडंगवाडी हे गाव सतत मराठा आरक्षण चळवळीत अग्रेसर आहे. कृष्णा पायघडे यांनी आजपर्यंत मराठा आरक्षणासाठी खूप मोठे योगदान दिलेले आहे. प्रत्येक आंदोलना दरम्यान स्वतः कडील असेलेला टेम्पो विना खर्च घेऊन प्रत्येक सभेला आणि प्रत्येक बैठकीला गावातील युवकांना घेऊन जात होते. कृष्णा यांच्या जाण्याने भडंगवाडीसह मादळमोही परिसरात शोककाळा पसरली आहे.

## प्राचार्य राजाभाऊ धाट सहस्त्रचंद्र दर्शन समारोहाचे ३० जुन रोजी आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणून ज्यांची महाराष्ट्रात सर्वदूर ख्याती आहे. विद्यार्थीप्रिय आणि प्रयोगशील प्राचार्य म्हणून ज्यांचा आजही नांवलौकिक आहे. व ज्यांनी शिक्षणासोबतच वित्त, ग्रामीण आणि कृषी विकास, अ.भा.वि.प., सहकार भारती अशा विविध क्षेत्रातील संस्था आणि सेवाकार्याच्या उभारणीत आणि विकास कार्यात आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्या प्राचार्य राजाभाऊ धाट यांच्या बहुमोल कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अंबाजोगाई शहरात प्राचार्य धाट यांचे चाहते, विद्यार्थी व विविध क्षेत्रातील सहकारी यांनी एकत्रित येत समारोह समितीच्या माध्यमातून सहस्त्रचंद्र दर्शन समारोहाचे रविवार, दिनांक ३० जून २०२४ रोजी आयोजन केले आहे. यावेळी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. अशी माहिती समारोह समिती व धाट परिवार यांच्या वतीने देण्यात आली आहे.



केल्यानें होत आहे रे । आधीं केलेंची पाहिजे ।। किंवा साधना के देश में मत नाम ले विश्राम का । कर्तव्य पथ पर तू बढा चल कार्य यह भगवान का ।। या मंत्राचा जागर करीत प्राचार्य धाट सर हे त्यांच्या आयुष्यात सतत कार्यरत राहिले आहेत. त्यांच्या बहुमोल कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अंबाजोगाई शहरात ज्येष्ठ वद्य नवमी शके १९४६, रविवार, दिनांक ३० जून २०२४ रोजी सकाळी ९ वाजेपासून सहस्त्रचंद्र दर्शन समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे. हा समारोह अनिकेत मंगल कार्यालय एल.आय.सी. ऑफीस समोर, परळी रोड, अंबाजोगाई, जि.बीड (महाराष्ट्र) येथे आयोजित करण्यात आला आहे. या समारोहाच्या अध्यक्षस्थानी डॉ.अशोक मोडक (भूतपूर्व राष्ट्रीय अध्यक्ष, अ.भा.वि.प. तथा गुरू घासीदास केंद्रीय विश्वविद्यालय, बिलासपूर कुलाधिपती) हे आहेत. यावेळी दाजी पणशीकर (ज्येष्ठ विचारवंत, ठाणे) यांचे आशीर्वचन लाभणार आहे. तर सूर्यकांत केळकर (भूतपूर्व राष्ट्रीय संघटन मंत्री, सहकार भारती) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. समारोहात सतीश मराठे (सदस्य, केंद्रीय संचालक मंडळ, भारतीय रिझर्व बँक) हे प्रमुख वक्ते आहेत. या कार्यक्रमाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे. सकाळी ९ ते १० या वेळेत तुला करण्यात येईल. त्यानंतर सकाळी १० ते ११ या कालावधीत मी अनुभवलेले धाट सर या विषयावर मनोगते व्यक्त करण्यात येतील. त्यानंतर सकाळी ११ ते दुपारी १ या कालावधीत प्रकट कार्यक्रम होईल. तसेच यावेळी मान्यवरांच्या हस्ते गौरव ग्रंथ विमोचन करण्यात येईल. तरी या प्रसंगी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे. समारोहास येताना पुष्पगुच्छ किंवा भेटवस्तू आणू नये. आपली उपस्थिती हीच अनमोल भेट आहे. अशी विनंती प्राचार्य राजाभाऊ धाट सहस्त्रचंद्र दर्शन समारोह समिती व धाट परिवार यांनी केली आहे. तर समारोहाबाबत अधिक माहितीसाठी समारोह समितीचे डॉ.अ.द.पत्की (मो.९४२०५७७१४७) , डॉ.प्रफुल्ल पानसे (मो.९४२२२१२२६०) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे

# माजी प्राचार्य डॉ.दादाहरी कांबळे यांना रामचंद्रजी इंगळे सामाजिक सेवा पुरस्कार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील छत्रपती शिवराय-फुले-शाहू-आंबेडकरी पुरोगामी विचारधारनेणे प्रेरित होऊन मा.रामचंद्रजी इंगळे सामाजिक सेवा प्रतिष्ठान, अंबाजोगाई जि.बीड ही संस्था कार्यरत आहे.आंबेडकरी चळवळीतील तत्वनिष्ठ आधारस्तंभ स्मृतिशेष रामचंद्र इंगळे (अप्पा )यांनी कर्तृत्वसंपन्न जिल्हा परिषद सदस्य (बीड ) म्हणून राजकीय,सामाजिक क्षेत्रात अतुलनीय योगदान दिले आहे. त्यांचे कार्य दिशादर्शक आणि दीपस्तंभाप्रमाणे प्रकाशमान आहे. स्मृतिशेष रामचंद्र इंगळे (अप्पा ) यांच्या वैचारिक भूमिकेची शिदोरी घेऊन कार्यरत असणाऱ्या व्यक्ती व संस्थेची दखल घेऊन त्यांना मा.रामचंद्रजी इंगळे सामाजिक सेवा प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी सन्मानित करण्यात येते. या सामाजिक सेवा प्रतिष्ठान संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी दिल्या जाणारा मा.रामचंद्रजी इंगळे सामाजिक सेवा पुरस्कार-२०२४ हा सामाजिक-शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे ज्येष्ठ शिक्षणतज्ञ, आदर्श शिक्षक, समाजभूषण माजी प्राचार्य डॉ .दादाहरी कांबळे यांना देवून गौरवण्यात येणार असल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.सिद्धार्थ तायडे,उपाध्यक्ष प्राचार्य डॉ.रमेश इंगोले , संस्थापक-सचिव बालासाहेब इंगळे यांनी जाहीर केला आहे.हा पुरस्कार शुक्रवार दि २८ जून २०२४ रोजी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान केला जाणार आहे.



या पुरस्कार प्रदान सोहळयाच्या अध्यक्षस्थानी मा.राजकिशोर (पापा) मोदी (श्री.बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-सचिव तथा माजी नगराध्यक्ष अंबाजोगाई ) तसेच ज्येष्ठ नेते ॲड.अनंतराव जगतकर, प्राचार्य डॉ डी एच थोरात, डी.जी.धाकडे ,ॲड.श्याम तांगडे, प्रा.व्ही.बी.चव्हाण, डॉ.मधुकर कांबळे, सी.व्ही.गायकवाड, महादेव आदमाने, एस.जी.गुळभिले,भारत सातपुते,ताराचंद शिंदे, संतोष शिंनगारे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

प्रतिष्ठानच्या माध्यमातून सामाजिक-शैक्षणिक-सांस्कृतिक-राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतील सामाजिक योगदान देणाऱ्या,निष्ठेने सेवा करून सामाजिक क्षेत्रात मौलिक कार्य करणाऱ्या व्यक्तीस अथवा सामाजिक संस्थांच्या कार्याचा यथोचित गौरव व्हावा यासाठी प्रतिष्ठानच्या वतीने २०१९ पासून हा पुरस्कार देण्याचे कार्यान्वीत केले आहे.२०१९ मध्ये आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते स्मृतिशेष एन. के.सरवदे (आप्पा) यांना तर २०२० मध्ये ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भानुदासजी देवरवाडे,२०२१मध्ये वैद्यकीय क्षेत्रात कार्य करणारे डॉ.मधुकर कांबळे,२०२२ मध्ये ज्येष्ठ भीमगीत गायक नागनाथ जोगदंड,२०२३ मध्ये सहकार व सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे अल्पसंख्याकांचे हितचिंतक समृत्तिशेष ख्वाजा बशीरोद्दिन ख्वाजा मोइनोद्दीन यांना प्रदान करण्यात आलेला आहे. २०२४ सालचा पुरस्कार ज्येष्ठ शिक्षणतज्ञ प्राचार्य डॉ.दादाहरी कांबळे यांना मान्यवरांच्या हस्ते मा.रामचंद्रजी इंगळे सामाजिक सेवा पुरस्कार शुक्रवार दि.२८ जून २०२४ रोजी बाळशास्त्री जांभेकर पत्रकार भवन, अंबाजोगाई येथे सकाळी साडे दहा वाजता प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कार सर्वांनी सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.सिद्धार्थ तायडे,उपाध्यक्ष प्राचार्य डॉ.रमेश इंगोले , संस्थापक सचिव बालासाहेब इंगळे तथा पदाधिकारी प्रा.कमलाकर इंगळे ,बळीराम जोगदंड ,ब्रिजेश इंगळे,दादासाहेब कसबे,रानबा गायकवाड, बा. सो. कांबळे,विकास वाघमारे,प्रा.शंकर सिनगारे,डॉ.बबन मस्के, शालन जोगदंड,रवींद्र देवरवाडे, दिलीप साठे ,प्रा.बी.एम.खरात,जीवनराव घाडगे,व्यंकट वाघमारे,केवळबाई इंगळे, वंदना इंगळे,जयश्री सिरसाट,धम्मानंद कांबळे, करुणाताई कांबळे, कांताबाई बनसोडे, प्रा.उषा कांबळे, आम्रपाली इंगळे, डॉ.भारती सोनवणे, स्वीतम इंगळे, रोहन इंगळे, विजय इंगळे,मिलिंद इंगळे आदींनी केले आहे.

## दुरुस्ती जाहीरनामा

**धारूर येथील श्रीमती ए.बी.जोंधळे २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर धारूर**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १७०/२०२४**

**शांता व इतर ३ वि.निरंक**

अर्जदार यांनी मयत राजेंद्र पिता रघुनाथ शिनगारे मौजे कसबा विभाग धारूर ता.धारूर जि.बीड हे दिनांक १९/०४/२०२४ रोजी गाथा मंदिर रोड, चव्हाण पोल्ट्रीजवळ, देहूगाव देहू, ता. हवेली, जि. पुणे येथे मयत झाल्याचे नमुद केले आहे. त्यांच्या पश्चात अर्जदार क्र.१ शांता भ्र.राजेंद्र शिनगारे, वय ५६ वर्षे, धंदा-घरकाम रा.कसबा विभाग धारूर ता.धारूर जि.बीड ह.मु. वाडाचा माळ गाथा मंदिर रोड चव्हाण पोल्ट्रीजवळ देहूगाव ता.हवेली जि.पुणे अर्जदार क्र.२. विलास पिता राजेंद्र शिनगारे, वय ३५ वर्षे, धंदा-व्यापार रा. सदर अर्जदार क्र.३ कैलास पिता राजेंद्र शिनगारे वय ३२ वर्षे, धंदा-व्यापार रा.सदर अर्जदार क्र.४. संगीता भ्र.महेंद्र झेंडे वय ३४ वर्षे, धंदा घरकाम रा.झेंडेमळा देहुगाव एलवाडी सेक्टर ता.हवेली जि.पुणे यांनी अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी अर्जदार क्र.२ व ३ हे मयताचे मुलं आणि अर्जदार क्र.४ ही मयताची मुलगी या नात्याने त्यांनी शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता व इतर महत्त्वाच्या कामकाजाकरीता वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत राजेंद्र पिता रघुनाथ सोळंके यांचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्णयाचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत राजेंद्र पिता रघुनाथ सोळंके यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २६-०६-२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

पुढील तारीख २३/०७/२०२४

सी.के.पवार
क लिपीक

(शिक्का)

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क. स्तर धारूर

# टोमॅटोने ठोकले शतक

## पावसाळ्यात भाव गगनाला भिडणार? : गेल्या वर्षी टोमॅटोने महागाईत ओतले होते तेल

यंदा भारतात कडक उन्हाळ्याने सर्वांनाच भाजून काढले. उत्तर भारतात तर सध्या उकाड्याने नागरीक हैराण आहेत. अनेक शहरात तापमानाने कमाल पातळी ओलांडली आहे. त्याचा थेट परिणाम भाजीपाला आणि फळ पिकांवर पडलेला दिसून येतो. तर देशातील अनेक भागात सुरुवातीला दमदार पाऊस झाल्यानंतर आता त्याने ओढ दिली आहे. त्यामुळे देशातील बाजारपेठेत भाज्यांची आवक रोडावली आहे. त्यामुळे भाजीपाल्याचा भाव कडाडले आहेत. मुंबईसह महाराष्ट्र आणि इतर राज्यात टोमॅटो आताच १०० रुपयांच्या घरात पोहचला आहे. ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर पण टोमॅटोचा भाव ९० ते ९५ रुपये प्रति किलोवर पोहचला आहे. महाराष्ट्रासह तामिळनाडू, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात टोमॅटोच्या किंमती ८० ते १०० रुपये प्रति किलोदरम्यान आहेत.

पावसाळ्यात कमी-जास्त होतो भाव

प्रत्येक वर्षी पावसाळ्यात भाजीपाल्याच्या किंमतीत वाढ होते. जोरदार पाऊस अथवा कमी पावसाचा थेट परिणाम भाजीपाला उत्पादनावर दिसून येतो. देशभरात सध्या उन्हाचा कहर सुरु आहे. भाजीपाला उत्पादन घटले आहे. तर ज्या भागात पाऊस पडला आहे. तिथे वाहतूक आणि साठवणीच्या अडचणीमुळे भाजीपाला सडण्याची



भीती असते. त्याचा परिणाम भाजीपाल्यांच्या किंमतींवर दिसून येतो.

निवडणूक आयोग ॲक्शन मोडवर; मुंबईत मतदानासंदर्भातील ठाकरेंच्या आरोपांची करणार शहानिशा; पण दिला हा इशारा चार पट अधिक लागवड, पण उत्पादन कमी

गेल्यावर्षी टोमॅटोने शेतकऱ्यांना लखपती आणि करोडपती केले होते. यावर्षी टोमॅटो उत्पादनात अधिक शेतकरी उतरले आहेत. गेल्यावर्षीपेक्षा चार पट अधिक लागवड झाली आहे. पण उत्पादनाला पाऊस आणि उन्हाचा फटका बसला आहे.  १८ च्या वृत्तानुसार, महाराष्ट्रातील अनेक भागात यंदा गेल्या वर्षीपेक्षा चार पट अधिक टोमॅटोची लागवड करण्यात आली. पण उन्हाळा आणि पावसाने ओढ दिल्याने उत्पादन मोठ्या प्रमाणात होऊ शकले नाही. जुन्नर तालुक्यात प्रत्येक वर्षी जवळपास २००० कार्टन प्रति एकर टोमॅटो उत्पादन होते. यंदा हे प्रमाण ५०० से ६०० कार्टन प्रति एकरवर आले आहे. हीच स्थिती अनेक भागात आहे.

सध्या तरी किंमती कमी होण्याची शक्यता कमीच : टोमॅटोच्या किंमतींमध्ये जनतेला कोणताच दिलासा मिळण्याची शक्यता नाही. मान्सूनमध्ये ग्राहकांच्या खिशावर ताण आल्याशिवाय राहत नाही. मान्सूनने डोळे वटारल्याने शेतकऱ्यांसह सरकारची चिंता वाढली आहे. मान्सूनला अजून उशीर झाल्यास खरीपाच्या उत्पादनावर मोठा परिणाम होईल. भाजीपाल्याच्या किंमती वाढतील. त्यामुळे सरकारला अगोदरच उपाय योजना करण्याशिवाय गत्यंतर नाही.

## शंभर किलो वजनाची 'दुंबा शेळी' जाणून घ्या वैशिष्ट्ये



शेतीव्यतिरिक्त पशुपालन हा असा एक पर्याय आहे जो शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यास मोठा हातभार लावतो. अलिकडे शेतकरी शेळी पालन मोठ्या प्रमाणात करू लागले आहेत. विविध प्रकारच्या जातीच्या शेळ्या पाळल्या जात आहेत. जातीनुसार शेळीचे वेगवेगळे वैशिष्ट्ये दिसून येतात. दुंबा नावाची शेळी सद्या लोकप्रीय होवू लागली आहे. शंभर किलो वजनाची शेळी म्हणून तिच्याकडे बघितले जाते.

उत्तर प्रदेशातील शेतकरी अनेक वर्षांपासून दुंबा शेळीपालन करत आहेत. या माध्यमातून अनेक शेतकरी दरवर्षी लाखो रूपयांची कमाई करतात. या जातीच्या बोकडाला ईदच्या दिवशी खूप मागणी असते. त्याला किंमत देखील चांगली मिळते. त्यामुळे शेळी पालन करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये ती लोकप्रिय आहे. या जातीचा नर देखील तेवढाच शेळी पालकांच्या पसंतीचा असून या जातीच्या शेळीची पिल्ले देखील मोठ्या प्रमाणात विकली जातात.

या जातीच्या शेळ्यांच्या पिल्लांची किंमत दोन महिन्यात तीस हजार रूपयांवर तर चार महिन्यात त्यांची किंमत ७० ते ७५ हजार रूपयांपर्यंत जाते. या जातीच्या शेळीची किंमत ही नर किंवा मादी या दराने मिळत नसून तिच्या वैशिष्ट्यांवर मिळते. परंतु मादी दुंबाला चांगली किंमत मिळते.

०००

दुंबा शेळीची वैशिष्ट्ये : दुंबा शेळी नऊ महिने ते एक वर्षाच्या कालावधीत पिल्लांना जन्म देते. एकावेळी एकाच पिल्लाला जन्म देते. सुरुवातीच्या दोन महिन्यात पिल्लांचे वजन २५ किलो होते. या जातीची पिल्ले दिसायला खूप आकर्षक दिसतात व त्यांना चांगली किंमत मिळते. एका वर्षात वर्षाच्या कोकराचे वजन सुमारे शंभर किलो होते असे शेतकरी सांगतात.

## कोकणसह पश्चिम महाराष्ट्रात ऑरेंज अलर्ट तर विदर्भातही मुसळधार पाऊस

राज्याच्या विविध भागात पाऊस कोसळत असल्याचं चित्र दिसत आहे. कुठं जोरदार पाऊस पडतोय, तर कुठं हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडतोय. दरम्यान, आजही राज्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. आज कोकणसह पश्चिम महाराष्ट्रात पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर विदर्भातही आज पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. जाणून घेऊयात हवामानाच्या अंदाजाबद्दल सविस्तर माहिती.

'या' जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट

हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, आज कोकणात अति मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तिन्ही जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. त्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी, असं आवाहन प्रशासनाच्या वतीनं करण्यात आलं आहे. तर पश्चिम महाराष्ट्रातील पुणे आणि सातारा जिल्ह्यात देखील मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

'या' भागात पावसाचा यलो अलर्ट जारी

दरम्यान, आज संपूर्ण विदर्भात देखील मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. आज संपूर्ण विदर्भात पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसे मुंबईसह, ठाणे पालघर या जिल्ह्यांना देखील पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तसेच उत्तर महाराष्ट्रात देखील पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## मराठवाड्यासह विदर्भाला पावसानं झोडपलं, मुसळधार पावसामुळे शेतीला तलावाचं स्वरूप

मुंबई : महाराष्ट्रात आज मुसळधार पावसाचा () अंदाज देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यातील अनेक जिल्ह्यात जोरदार पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. मराठवाड्यासह विदर्भाला पावसानं चांगलं झोडपलं आहे. वाशिमच्या काकडदाती गावात मुसळधार पाऊस शेतीला तलावाचं स्वरूप आलं आहे. परभणीच्या पूर्णा तालुक्यातील अनेक भागात जोरदार पाऊस सुरु आहे, त्यामुळे शेतात पाणीच पाणी झालं आहे.

मुसळधार पावसामुळे शेतीला तलावाचं स्वरूप : आज सलग चौथ्या दिवशी वाशिम जिल्ह्या अनेक भागात जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. वाशिम तालुक्यातील काकडदाती परिसरासह अनेक भागात मुसळधार पावसाने झोडपून काढल्यानं शेती पेरलेल्या बियाण्यांसह खरडून गेलीय. या पावसामुळे शेतीला काही काळ तलावाचं स्वरूप आलं होतं, तर नाले ओसंडून वाहू लागले आहेत. नुकत्याच खरिपाची पेरणी केलेलं बियाणे पावसात वाहून गेल्यानं शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचं संकट आलंय. या सर्व नुकसानीचे पंचनामे



करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केलीय.

शेतशिवरांत पाणीच पाणी

परभणीच्या पूर्णा तालुक्यातील लिमला, ईटलापूर माळी, दगडवाडी, मजलापूर, खंडाळा  या भागातील शेतशिवारामध्ये जोरदार पाऊस झाला आहे. या पावसामुळे पेरण्यांना वेग येणार आहे. आधी कापूस. हळद लावलेल्या पिकांना हा पाऊस उपयुक्त ठरणार आहे. जोरदार झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांना शेतातील काम लवकर बंद करून घरी यावं लागलं.सर्वत्र शेतशिवारा मध्ये पाणीच पाणी झाल्याचे चित्र या जोरदार पावसामुळे पाहायला मिळाले.

छत्रपती संभाजीनगरमध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील करमाड, जयपूर, भाम्बर्डा, लाडगाव आणि कुंबेफळ यासह आसपासच्या परिसरात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला आहे. त्यामुळे या शिवारातील असणारे छोटे-मोठे ओढे आणि नद्यांना काही काळ मोठ्या प्रमाणात पूर आला होता. याशिवाय शेतातही मोठं पाणी साचल्याचं पाहायला मिळालं.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७२३ : रशियन सैन्याने अझरबैजानची राजधानी बाकू जिंकली.
१८१९ : सायकलचे पेटंट देण्यात आले.
१९०६ : पहिली ग्रांड प्रिक्स मोटर रेस स्पर्धा आयोजित करण्यात आली.
१९४९ : बेल्जियम देशांतील महिलांना प्रथमच संसदीय निवडणुकीमध्ये मतदान करण्याचा हक्क मिळाला.
१९५९ : स्वीडिश बॉक्सर इंगेमेर जोहान्सन हे हेव्ही वेट बॉक्सिंगचे जागतिक विजेते झाले.
१९६० : सोमालियाला (इंग्लंडकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९६० : मादागास्करला (फ्रान्सकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९६८ : पुणे महापालिकेने उभारलेल्या बालगंधर्व रंगमंदिराचे उद्घाटन झाले.
१९७४ : ओहायो (अमेरिका) येथील एका सुपर मार्केटमधे वस्तुंवर बार कोड लावण्यास सुरूवात झाली.
१९७४ : नागपुरजवळील कोराडी येथील (त्याकाळच्या) सर्वात मोठया वीजनिर्मितीकेंद्रातून वीजनिर्मितीला प्रारंभ
१९७५ : पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या आदेशावरुन राष्ट्रपती फख्रुद्दीन अली अहमद यांनी आणीबाणीचा वटहुकूम जारी केला.
१९७७ : एल्व्हिस प्रेस्लीचा शेवटचा जाहीर कार्यक्रम झाला.
१९७९ : मुष्टियोद्धा मुहम्मद अली यांनी निवृत्ती घेतली.
१९९९ : नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्याचे विभाजन करुन माहूर हा नवा तालुका निर्माण करण्यात आला.
१९९९ : पंतप्रधान अटलबिहारी बाजपेयी यांच्या हस्ते शिवाजीराजांची मुद्रा असलेले २ रुपयांचे नाणे चलनात आणण्याचा समारंभ पुणे येथे झाला.
२००० : पी. बंदोपाध्याय या भारतीय हवाईदलातील पहिल्या महिला एअर कमोडोर बनल्या.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६९४ : स्वीडिश रसायनशास्त्रज्ञ जॉर्ज ब्रांड यांचा जन्म.
१७३० : चार्ल्स मेसिअर  फ्रेन्च खगोलशास्त्रज्ञ (मृत्यू: १२ एप्रिल १८१७)
१८२४ : लॉर्ड केल्व्हिन  इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ व गणितज्ञ (मृत्यू: १७ डिसेंबर १९०७)
१८३८ : वंदे मातरम्? या राष्ट्रगीताचे कवी, निबंधकार, कादंबरीकार, तत्त्वज्ञ, भाषाशास्त्रज्ञ, धर्ममिमांसक व सुधारक बंकिमचंद्र यादावचंद्र चटर्जी यांचा कंतलपाडा परगणा बंगाल येथे जन्म. (मृत्यू: ८ एप्रिल १८९४)
१८७३ : अँजेलिना येओवार्ड ऊर्फ 'गौहर जान' गायिका व नर्तिका (मृत्यू: १७ जानेवारी १९३०)
१८७४ : छत्रपती शाहू महाराज  सामाजिक सुधारणांचे कृतीशील पुरस्कर्ते, कला, नाटक, संगीत यांचे प्रोत्साहक (मृत्यू: ६ मे १९२२)
१८८८ : नारायण श्रीपाद राजहंस ऊर्फ 'बालगंधर्व'  गायक व अभिनेते (मृत्यू: १५ जुलै १९६७)
१८९२ : पर्ल एस. बक  नोबेल पारितोषिक विजेत्या (१९३८) अमेरिकन लेखिका (मृत्यू: ६ मार्च १९७३)
१९१४ : शापूर बख्तियार  ईराणचे ७४ वे पंतप्रधान (मृत्यू: ६ ऑगस्ट १९९१)
१९१६ : मराठ्यांच्या ग्वाल्हेर राज्यातील सिंधिया घराण्याचे शेवटचे शासक महाराजा जिवाजीराव सिंधिया यांचा जन्मदिन.
१९१८ : परमवीर चक्र सन्मानित माजी भारतीय सैन्य अधिकारी मेजर रामा राघोबा राणे यांचा जन्मदिन.
१९५१ : गॅरी गिल्मोर  ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू
१९९२ : अर्जुन पुरस्कार प्राप्त भारतीय हॉकी खेळाडू मनप्रीत सिंह यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

३६३ : रोमन सम्राट ज्यूलियनची हत्या (जन्म: ? ? ३३२)
१८१० : हॉट एअर बलून चे सहसंशोधक जोसेफ-मायकेल मॉन्टगॉल्फ़र यांचे निधन.
१९४३ : कार्ल लॅन्ड्स्टायनर  नोबेल पारितोषिकविजेते ऑस्ट्रियन जीवशास्त्रज्ञ (जन्म: १४ जून १८६८)
१९६१ : प्रसिद्ध भारतीय हिंदी साहित्यकार गोविंद शास्त्री दुगवेकर यांचे निधन.
१९८० : पत्रकार गोविंद मोरेश्वर तथा आप्पा पेंडसे यांचे निधन.
१९९४ : प्रसिद्ध बांगलादेशी राजकारणी व लेखिका जहनारा इमाम यांचे निधन.
२००१ : वसंत पुरुषोत्तम ऊर्फ व. पु. काळे  लेखक व कथाकथनकार (जन्म: २५ मार्च १९३२)
२००४ : यश जोहर  हिन्दी चित्रपट निर्माता (जन्म: ६ सप्टेंबर १९२९)
२००५ : एकनाथ सोलकर  अष्टपैलू क्रिकेटपटू (जन्म: १८ मार्च १९४८)
२००८ : जनरल माणेकशॉ यांचे निधन.

## जीवाणु संवर्धन प्रक्रियेचे फायदे आणि अनुप्रयोग

जीवाणु संवर्धन प्रक्रिया हे एक प्राकृतिक उपाय आहे ज्यामध्ये बियाण्यांच्या उगवणीत माध्यमाने जीवाणुंचे वापर करण्यात येते. हे प्रक्रिया जमिनीतून रोग प्रतिबंधात्मक क्रियाशीलता सुरू करते आणि बियाण्यांची उगवण क्षमता वाढते. त्याच्यात जीवाणू संवर्धकांचे वापर करण्यात येते, ज्यामुळे रोपांच्या सतेज व जोमदारपणे वाढते. या प्रक्रियेत वापरलेल्या बियाण्यांची उत्पादने वाढतात आणि कमी खर्चात रोग प्रतिबंधात्मक उपाय करून पेरणी करता येते. ह्या प्रक्रियेचा वापर करण्यामुळे जमिनीतुन सेंद्रीय पदार्थ कुजवून जमीन सुधारण्यास मदत होते.

बिजप्रक्रियेचे फायदे: १) जमिनीतुन व बियाणाद्वारे पसरणारया रोगांचा प्रादुर्भाव टाळता येतो. २) बियाण्याची उगवण क्षमता वाढते. ३) रोपे सतेज व जोमदारपणे वाढतात. ४) पिकाच्या उत्पादनात वाढ होते. ५) कमी खर्चात रोग प्रतिबंधात्मकउपाय करून पेरणी करता येते. जिवाणु संवर्धकाची बिजप्रकिया २५० ग्रॅम जीवाणु सवर्धकाचे पाकिट १० ते १५ किलो बियाण्यास वापरावे १ लिटर गरम पाण्यात १२५ ग्रॅम गुळ टाकुन द्रावण तयार करावे. द्रावण थंड झाल्यावर त्यामध्ये २५० ग्रॅम जीवाणु संवर्धन टाकुन बियाण्यास हळुवारपणे लावावे किंवा जीवाणु संवर्धकाचा लेप बियाण्यावर समप्रमाणात बसेल व बियाण्यांचा पृष्ठभाग (साल) खराब होणार नाही याची काळजी घ्यावी. बियाणे ओलसर करुन जीवाणू संवर्धन करणारे जिवाणू बियाण्यास चोळावेत नंतर बियाणे सावलीत स्वच्छ कागदावर सुकवावे. अशी बिजप्रक्रिया केलेल्या बियाण्यांची पेरणी ताबडतोब करावी त्यामुळे जमिनीतुन सेंद्रीय पदार्थ कुजवून जमीन सुधारण्यास मदत होते.

जीवाणू संवर्धन बिज प्रक्रियेबाबतची दक्षता : जीवाणू संवर्धन प्रक्रिया ही बुरशीनाशके किंवा कीटकनाशकांची प्रकिया केल्यानंतर करण्यात यावी. जीवाणु सवर्धके लावण्यापुर्वी जर बियाण्यास किटकनाशकाचे, बुरशीनाशके, जंतुनाशकाचे इ. लावलेले असतील तर जीवाणु संवर्धन नेहमीपेक्षा दीडपट जास्त प्रमाणात लावावे. रायझोबियम जीवाणु संवर्धनाची प्रक्रिया पाकीटावर नमुद केलेल्या विशिष्ट पिकाच्या गट समुहास करावी(एकदल, द्विदल, व व्यापारी पिके). ट्रायकोडर्मा जैविक बुरशिनाशक सोबत रायझोबियम अझोटोबॅक्टर, स्फुरद विरघळणारे जीवाणु या जीवाणु संवर्धकाची बिजप्रक्रिया करता येते.



# टाटा इन्स्टिट्यूटला शासनाकडून आदेश नसल्याने मुस्लीम सर्व्हेक्षणाचे काम रखडले-जे.डी.शाह

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य हे वंचितांसाठी आरक्षणाची तरतूद करणारे अग्रेसर राज्य आहे आणि नागरिकांचे. मागासवर्ग यांमधील लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थिती चांगली करण्यासाठी महाराष्ट्र राज्य संपुर्ण देशात ओळखले जात असताना जवळपास दोन वर्ष उलटले तरी राज्य सरकारने मुस्लीम समाजाच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा सर्व्हेक्षण करुन अहवाल तयार करण्यासाठी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस मुंबई ला कार्यादेश जारी केले नसल्याने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार देवेंद्र फडणवीस तसेच अल्पसंख्याक विकास मंत्री अब्दुल सत्तार साहेब यांना निवेदन पत्र लिहून टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसला तातडीने कार्यादेश देऊन मराठा -ओबीसी आरक्षण आंदोलनाची- त्रीवता पहाता मुस्लिम समाजाच्या सहनशीलतेची दखल घेऊन न्यायालयाच्या निर्देशानुसार ५ टक्के शैक्षणिक आरक्षण लागू करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते जे.डी.शाह यांनी ईमेलद्वारे केली आहे.

ई -मेलद्वारे पाठविण्यात आलेल्या निवेदनाच्या माध्यमातून मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री आणि अल्पसंख्याक मंत्री यांच्या निदर्शनास आणून दिले की राज्य सरकारच्या अल्पसंख्याक विकास विभागाने सन २१-२०२२ रोजी एक सरकारी ठरावा द्वारे शासन निर्णय) जारी करून टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस मार्फत मुस्लिम समाजातील शैक्षणिक व आर्थिक स्थितीवर अभ्यास करण्यासाठी नियुक्त केले होते आणि त्यासाठी ३३ लाख रुपये मंजूर केले होते. मात्र, दोन वर्षे उलटून देखील संबंधित संस्थेला महाराष्ट्र राज्य सरकारने लेखी आदेश दिलेले नसल्याने सर्व्हेक्षणाचे काम रखडले आहे. त्यामुळे मुस्लिमांच्या हक्काच्या पाच टक्के आरक्षण लागू होऊ शकले नाही. याला मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांचा बेजबाबदार पणा कारणीभूत आहे असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. पत्रात शेवटी म्हटले आहे की कारण यापूर्वी महमूद-उर-रहमान समितीच्या अहवालानंतर २०१३ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी देखील राज्यातील मुस्लिमांच्या स्थितीचा अभ्यासासाठी सरकारने ३३. ९ लाख रुपयांचे तरतूद करून सर्व्हेक्षणानुसार. गेल्या काही वर्षांत मुस्लिमांना सरकारी योजनांचा फायदा झाला का, याचा अभ्यास करण्यासाठी सरकारने राज्यातील मुस्लिम समाजासाठी राज्य सरकारने केलेल्या प्रयत्नांचा पाहणी अहवाल टिआयएसएस ला सादर करण्याचा सरकारी ठराव जारी केला होता. त्यानुसार सदर संस्था राज्यात पुन्हा मुस्लिम बहुसंख्य लोकसंख्या बीड जिल्ह्यातीसह असलेल्या ५६ भागात अभ्यास करेल. मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करून महाराष्ट्र राज्यातील मुस्लिम समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे या अभ्यासाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते.या अभ्यास गटाद्वारे विकासाच्या विविध क्षेत्रांमध्ये मुस्लिमांचा सहभाग वाढवण्यासाठी उपाय सुचवेल. डॉ.महमूद-उर-रहमान समितीनंतर मुस्लिम समाजाचा हा पहिला राज्यव्यापी अभ्यास ठरले असते. कारण यापूर्वी महाराष्ट्रातील मुस्लिमांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी एक समिती स्थापन केली होती. त्याला एका निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी पाच वर्षे लागलेल्या या समितीने महाराष्ट्रातील मुस्लिमांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचे विदारक चित्र मांडले होते. २०१३ मध्ये सादर केलेल्या अहवालात असे म्हटले होते की महाराष्ट्रात सुमारे ६० टक्के मुस्लिम दारिद्र्यरेषेखाली आहेत. सरकारी नोकऱ्यांमध्ये मुस्लिमांचा वाटा फक्त ४.४ टक्के होता आणि समाजातील एकूण पदवीधरांची संख्या केवळ २.२ टक्के होती. समितीने अहवालात शिक्षण आणि सार्वजनिक आणि खाजगी अशा आठ टक्के आरक्षणाची शिफारस केली आणि समाजातील एका मोठ्या वर्गाचे दुःख दूर करण्यासाठी आरक्षणाची शिफारस आवश्यक असल्याचे सांगितले होते. रहमान समितीच्या अहवालावर आधारित, तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारने २०१४ मध्ये सरकारी शाळा, महाविद्यालये आणि नोकऱ्यांमध्ये मुस्लिमांसाठी पाच टक्के आरक्षण जाहीर केले होते. या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. मुंबई उच्च न्यायालयाने १४ नोव्हेंबर रोजी दिलेल्या निकालात नोकऱ्यांमधील पाच टक्के आरक्षणाचे कलम हटवले पण मुस्लिमांना शिक्षणात पाच टक्के आरक्षण द्यावे, असे म्हटले आहे. २०१४ मध्ये सत्तेवर आलेल्या भाजप -शिवसेना सरकारने धर्माच्या आधारावर आरक्षणाला समर्थन देत नसल्याचे सांगत आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी कायदेशीर पावले उचलली नाहीत.तब्बल आठ वर्षा नंतर शिंदे आणि फडणवीस सरकारने मुस्लिम हितासाठी अभ्यास गट स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र सदर निर्णय होऊन दोन वर्षे झाली तरी अद्याप पर्यंत त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.कारण फक्त कागदोपत्री निर्णय घेऊन मुस्लिम समाजाची दिशाभूल करण्यात आली आहे. त्यामुळे मुस्लिम समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसला शासनाकडून आदेश नसल्याने सर्व्हेक्षणाचे काम रखडले आहे असा आरोप सामाजिक कार्यकर्ते जे.डी.शाह यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातुन शेवटी केला आहे.

# मंडळ अधिकारी विघ्ने यांची चौकशी करुन कार्यवाही करा

## आम आदमी पार्टीची निवेदनाद्वारे मागणी



बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील महसुल मंडळ म्हाळस जवळा येथे कार्यरत असणार्या वंदना विघ्ने या मंडळाधिकारी सर्वसामान्य शेतकरी व ग्रामस्थांना मंडळांतर्गत येणार्या कुठल्याही कामासाठी पैसे मागतात नाहीतर ही काम करु नका असे उद्धट बोलतात त्यामुळे आम आदमी पार्टीच्या वतीने आज दादासाहेब सोनवणे, भीमराव कुटे, दत्ता सुरवसे, प्रविण पवार, मदन जामकर, चंद्रकांत लहामगे, आसमान जरांगे, कृष्णा जगताप यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना मागणी केली आहे.

पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, मंडळ अधिकारी विघ्ने सर्व सामान्य शेतकरी व ग्रामस्थांना मंडळांतर्गत येणार्या कुठल्याही कामासाठी पैसे मागतात तसेच फेरफार करण्यासाठी प्रत्येकी ३५००/- रुपये प्रमाणे वसुली करीत आहेत व पैसे न दिल्यास त्या मंडळांतर्गत येणार्या तलाठ्यास दमदाटी करुन तुम्ही पैसे घ्या तरच ६-क पत्र ऑनलाईन फेरफार करा अन्यथा करु नका असे दमदाटी करुन बोलतात. शेतकरी भिमराव चंद्रकांत कुटे रा.अंथरवणपिंप्री ता.जि.बीड गट नंबर ८९ अंथरवणपिंप्री व गट नंबर ६७ गणपुर शिवारातील वाटणीपत्रक करण्यास तलाठी श्री.गुरसाळी यांच्या मार्फत ऑनलाईन केले असता भीमराव कुटे यांना दोन फेरचे ७०००/- रुपये मंडळ अधिकारी वंदना विघ्ने यांनी तलाठी गुरसाळी यांचेमार्फत मागत आहेत. जिल्हाधिकारी व प्रशासनाने भ्रष्ट मंडळ अधिकारी वंदना विघ्ने यांची चौकशी करुन ८ दिवसांत यांच्यावर कायदेशीर कडक कार्यवाही करण्यात यावी अन्यथा लोकशाही मार्गाने आम आदमी पार्टीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकर्यांना सोबत घेवून एकदिवशीय अन्नत्याग उपोषण करण्याचा इशारा आपच्या वतीने देण्यात आला आहे.

# कृषिदुतांचे दहिफळ गावात सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थांकडून स्वागत

बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत, आदित्य शिक्षण संस्थेच्या, जि. बीड आदित्य कृषि महाविद्यालयाचे कृषिदूत अभिषेक गरड, गौरव तारळकर, संघर्ष शिंदे ,ओम शेंडे ,अनिकेत पिसोळे, विवेक झगडे, किरण चौडिये, शुभम सलगर यांचे ग्रामीण कृषि कार्यानुभव व कृषि औद्योगिक कार्यक्रम २०२४-२५ च्या अभ्यास दौऱ्यानिमित्ताने दहीफळ येथे आगमन झाले. दहीफळ येथील ग्रामस्थांनी कृषी दूतांचे स्वागत केले.




या अभ्यास दौऱ्या दरम्यान कृषिदूत शेतकऱ्यांना शेतीविषयक शास्त्रीय माहिती, हंगामाप्रमाणे पीक पद्धती, रासायनिक खतांचा योग्य वापर, कीटकनाशके फवारताना घ्यावयाची काळजी कीटकनाशक आणि सेंद्रिय शेती याबद्दल माहिती देतील. अभ्यास दौऱ्याचा कालावधी चार महिन्यांचा असून यादरम्यान माती परीक्षण, पाणी व्यवस्थापन,कीड रोग, पीक संरक्षण याबाबत प्रात्यक्षिक घेतले जातील. आगमना वेळी दहीफळ येथील ग्रामसेवक, सरपंच देविदास राऊत, उपसरपंच रामेश्वर काळे आणि ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते. या अभ्यास दौऱ्यास विद्यार्थ्यांना आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष डॉ. आदिती सारडा आणि आदित्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुकाराम तांबे, प्राचार्य सानप, कार्यक्रम समन्वयक डॉ. संदीप मोरे आणि कार्यक्रम अधिकारी वैभव शिंदे व महाविद्यालयातील इतर प्राध्यापक आणि सर्व विषय तज्ञांचे मार्गदर्शन लाभत आहे.

# प्रयत्नात सातत्य ठेवल्यास यश मिळते: सागर धस

## मंझरी येथील ऋषीकेश गितेची लेखाधिकारीपदी निवड



बीड। प्रतिनिधी

ग्रामीण भागातील मुलांच्या वाट्याला प्रचंड मोठा संघर्ष येतो. बिकट परिस्थितीशी झुंजत ग्रामीण भागातील मुले स्वतःचे शिक्षण पूर्ण करतात. त्यांचे यश हे त्यांच्या संघर्षात असते. ऋषी गीतेच्या वाट्याला असाच संघर्ष. त्याच्या संघर्षाचा आदर्श सर्वांनी घ्यावा असे उद्गार सागर धस यांनी काढले.

पाटोदा तालुक्यातील मंजुरी घाट येथील रहिवाशी ऋषी आबासाहेब गीते याची वन विभागातील अकाउंटपदी नियुक्ती झाली. त्यानिमित्त ग्रामस्थांच्या वतीने त्याच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या सत्कार समारंभाच्या निमित्ताने सागर धस बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले जिल्हा परिषद माजी सभापती महेंद्र गर्जे यांनीही मार्गदर्शन केले. ते म्हणाले,स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी व्हायचं असेल तर चिकाटी आणि जिद्द असावी. ध्येयाप्रती निष्ठा असावी. यानंतर डेप्युटी लेबर कमिशनर अभय गीते, गहिनीनाथ नागरगोजे दुय्यम दुय्यम निबंधक उत्पादन शुल्क, सिताराम गड खर्डा येथील इंगोले महाराज, ज्येष्ठ विस्तार अधिकारी बापूराव राख यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर ऋषी गिते याने मनोगत व्यक्त केले. आपल्या ध्येयापर्यंत पोहोचणं सोप्प नसतं पण निरंतर कष्ट चिकाटी असेल तर नक्कीच ध्येयापर्यंत पोहोचता येते. त्यामुळे खेड्यातील मुलांनी न्यूनगंड न बाळगता परिश्रम घेऊन यश संपादन करावे. या कार्यक्रमाला वरील मान्यवरासह सपोनि साबळे , सरपंच सौ.सिंधुताई गीते, उपसरपंच प्रकाश नांदे, तंटामुक्त अध्यक्ष कुमार नांदे, माजी सरपंच बाळासाहेब नांदे, बबन गीते, सुभाष गीते, ग्रामपंचायत सदस्य संतोष चोले, पोपट गीते, चेअरमन तुळशीराम गीते, दत्ता गीते,शाळेचे मुख्याध्यापक धांडे, सहशिक्षक माळकर, बाबासाहेब गिते, दादासाहेब गिते यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# पिसाळलेल्या कुत्र्याचा आष्टी शहरात हैदोस

## नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

आष्टी। प्रतिनिधी

कालपासून आष्टी शहरात एका पिसाळलेल्या कुत्र्याने हैदोस मांडला आहे.सोमवार (ता.२४) रोजी सायंकाळी अहमदनगर-बीड मार्गावर असलेल्या एका वॉशिंग सेंटर येथे काम करणाऱ्या मुस्तफा सय्यद नावाच्या व्यक्तीला या पिसाळलेल्या कुत्र्याने सर्वात प्रथम चावा घेतला.यानंतर बस स्थानक परिसरात येऊन तेथील दोन प्रवाशांना तर पुढे मानवी वसाहत असलेल्या संजीर बावरे, बाबासाहेब चव्हाण,आदित्य गिऱ्हे,नामक इसमाला या पिसाळलेल्या कुत्र्याने जबर चावा घेतला असल्याची घटना घडली आहे.तांबड्या रंगाच्या कुत्र्याने सहा लोकांना जबर चावा घेतला आहे.

शहरातील विविध ठिकाणी सदरील पिसाळलेल्या कुत्र्याने अनेकांना चावा घेऊन बाधित केले आहे.घटनेची माहिती समजताच नगरसेवक नाजीम शेख यांनी काल रात्री बाधित रुग्णांवर आष्टी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आणण्यात आले व प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी अहमदनगर जिल्हा रुग्णालय येथे पाठविण्यात आले आहे. काल रात्री पिसाळलेल्या कुत्र्याने सर्वात प्रथम चावा घेतलेल्या मुस्तफा शेख यांनी घटनेची माहिती नगरसेवक नाजीम शेख यांना दिली असता नाजीम शेख यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आवाहन केल्याने नागरिक सतर्क झाले.

# जीएसटी संदर्भातील काही प्रश्न निकाली

## बीड जिल्हा व्यापारी महासंघाच्या मागणीला यश

बीड । प्रतिनिधी

जी.एस टी कौन्सिल च्या बैठकी मध्ये बऱ्याच तरतुदी वर व्यापाऱ्यांना सुट देण्यात आली आहे. जसे की कलम १६(४) मधील इनपुट टॅक्स क्रेडिट घेण्याची मुदत ही २०१७ ते २०२१ या सर्व वर्षांसाठी ३० नोव्हेंबर करण्यात आलेली आहे. तसेच काही चुकीमुळे व्याज व दंड अशी अशी रक्कम देय काढण्यात आली होती, जर व्यापाऱ्याने ३१ मार्च २०२५ पर्यंत पूर्ण कर भरणा केल्यास त्या वरील व्याज व दंडास सूट देण्यात आली आहे. याबाबत बीडच्या व्यापारी महासंघाच्या शिष्टमंडळाने तत्कालीन केंद्रीय अर्थ राज्य मंत्री मा. पंकजजी चौधरी तथा बीड जिल्ह्याचे तत्कालीन खा. प्रितमताई मुंडे यांच्या समवेतच्या बैठकीत मागण्या मांडल्या होत्या.

जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोक शेटे व ऑल इंडिया ऍग्रो इनपुट डीलर असो.चे अध्यक्ष मनमोहन कलंत्री यांची नवी दिल्ली येथे दि.६ फेब्रुवारी २०२४ रोजी तत्कालीन केंद्रीय अर्थ राज्य मंत्री मा. पंकजजी चौधरी तथा बीड जिल्ह्याचे तत्कालीन खा. प्रितम मुंडे यांच्या समवेत बैठक पार पडली होती. या बैठकीत व्यापाऱ्यांच्या जी.एस टी व इतर जाचक तरतुदींवर चर्चा होऊन त्या दूर कराव्यात या मागणीचे त्यांना निवेदन देण्यात आले होते. त्यावर त्यांनी सकारात्मक निर्णय घेऊ असे शिष्टमंडळास आश्वासन दिले होते. त्या अनुषंगाने दि.२२ जून रोजी झालेल्या जी.एस टी कौन्सिल च्या बैठकी मध्ये बऱ्याच तरतुदी वर व्यापाऱ्यांना सुट देण्यात आली आहे.जसे की कलम १६(४) मधील इनपुट टॅक्स क्रेडिट घेण्याची मुदत ही २०१७ ते २०२१ या सर्व वर्षांसाठी ३० नोव्हेंबर करण्यात आलेली आहे. तसेच काही चुकीमुळे व्याज व दंड अशी अशी रक्कम देय काढण्यात आली होती, जर व्यापाऱ्याने ३१ मार्च २०२५ पर्यंत पूर्ण कर भरणा केल्यास त्या वरील व्याज व दंडास सूट देण्यात आली आहे.अश्या काही मागण्या आंशिक स्वरूपात सरकारच्या वतीने मान्य करण्यात आलेल्या आहेत. अजून काही व्यापारी प्रश्नांसंदर्भात सतत पाठपुरावा करून ते प्रश्न देखील सोडवण्यात येतील असे व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोक शेटे यांनी म्हटले आहे. या शिष्टमंडळात बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोक शेटे, ऑल इंडिया ऍग्रो इनपुट डीलर असो.चे अध्यक्ष मनमोहन कलंत्री , वाय.जनार्दन राव, सी.ए. गोपाल लड्डा,सी.ए.आनंद नहार संभाजीनगर,सी.ए.यश लड्डा जयपूर यांची उपस्थिती होती.

# रक्तदान शिबीर व विवीध सामाजीक उपक्रमाचे आयोजन

धारूर। प्रतिनिधी

धारूर शहरात राजश्री शाहु महाराज जयंती उत्सव समितीचे वतीने २६ जुन रोजी विवीध सामाजीक उपक्रम व रक्तदान शिबीराचे आयोजन करून राजश्री शाहू महाराजाची जयंती साजरी करण्यात येणार असून सर्व नागरीकानी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे अवाहण उत्सव समितचे वतीवतीने करण्यात आले आहे.

धारूर शहरात प्रतीवर्षा प्रमाणे या ही वर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती समितीचे वतीने छत्रपती राजश्री शाहू महाराज यांची जयंती उत्साहात व विवीध कार्यक्रमानी साजरी करण्यात येणार असुन राजश्री शाहू महाराज चौकात मान्यवराचे हस्ते ध्वजारोहन व प्रतीमा पुजन करून जि प माध्यमिक शाळा धारूर येथे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहीत्याचे वितरण करण्यात येईल येथील हुतात्मा स्मारका मध्ये रक्तदान शिबीराचे आयोजन सकाळी १०-०० करण्यात आले आहे सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरी करण्यात येणार आहे या सर्व कार्यक्रमाला जास्ती जास्त नागरीकानी उपस्थित राहवे असे अवाहण उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष बंडोबा संवत व उत्सव समिती अध्यक्ष शरद सांवत यांनी केले.

# बोगस बि बियाणे खताच्या कंपन्यांना कृषी खात्याच्या टोळक्याचे सहकार्य का?-वसंत मुंडे

परळी। प्रतिनिधी

महाराष्ट्रातील अकार्यक्षम त्रिमूर्ती सरकारच्या कृषी खात्यामध्ये बोगस खते बी बियाणे औषधी पुरवणाऱ्या कंपन्यावर कायदेशीर कारवाई करण्यास विलंब का असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला .

पाऊस चांगला झाल्यामुळे खरिपाच्या पेरणीला सुरुवात झालेली असून पर राज्यातून अनेक कंपन्यांनी एजंट मार्फत कृषी दुकानदारांना माल पुरवलेला आहे. त्यामध्ये अनेक दुकानदाराकडून वाढीव दराने खते बी बियाणे औषधे संदर्भात विक्री केली जात आहे तरीही कृषी खात्याच्या गुण नियंत्रण विभागाकडून तपासण्या केल्या जात नाहीत. पर राज्यातून गुजरात व मध्य प्रदेश भागातून खूप मोठ्या प्रमाणावर बोगस खते बियाणे कीटकनाशके राज्यात आलेले असून शेतकऱ्यांची कंपन्या व व्यापारी आर्थिक लूट करीत आहेत तरीही त्रिमूर्ती सरकारकडून कारवाई केली जात नाही कारण कृषी खातेच बोगस कंपन्या बरोबर आर्थिक व्यवहारात टक्केवारी देण्या घेण्याबाबत सोनेरी टोळक्या सोबत तोडजोड केल्याचा आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला आहे. अनेक विभागांमध्ये वरिष्ठाकडून कृषी खात्याच्या जबाबदार अधिकाऱ्यावर फोन द्वारे धमक्या दिल्या



जात आहेत कंपन्यावर कारवाई करून गुन्हे नोंद करू नका असे संवाद साधलेला अनेक प्रकरणात उघडकीस आलेला आहेत ,त्यामुळे कृषी खात्याचे अधिकारी दडपणाखाली आहेत बोगस कंपनीच्या दबावाखाली अप्पर मुख्य सचिव व कृषी आयुक्त तसेच अनेक संचालक, विभागीय सहसंचालकांना जिल्हा कृषी अधीक्षक यांचे चार्ज काढून घेणे व देणे संदर्भात खूप मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार झाल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी त्रिमूर्ती सरकारवर केला आहे. कृषी खात्याकडे तालुका जिल्हा विभाग राज्यस्तरीय कोणत्याच कंपनीच्या खते बियाणे औषधी संदर्भात माहिती उपलब्ध नसून अनेक तक्रारी शेतकऱ्यांनी करूनही नियमानुसार कारवाई केली जात नाही . मराठवाड्यात व विदर्भात खूप मोठ्या प्रमाणावर बोगस कंपन्यांनी हाहाकार माजवला असून शेतकऱ्याला चारी बाजूंनी हातबल केले आहे, तरीही शासनामार्फत कारवाई केली जात नाही असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला . येणाऱ्या पावसाळी अधिवेशनात प्राधान्याने बोगस खते बियाणे कीटकनाशके औषधी संदर्भात तात्काळ नव्याने कायदा पास करून शेतकऱ्याला आर्थिक नुकसान भरपाई देण्याची तरतूद करण्याची मागणी निवेदनाद्वारे शासनाकडे काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केली आहे.

# आदित्य कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणासाठी निवड

बीड। प्रतिनिधी

शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा विद्यार्थी वेदांत अनिल भस्मे याची उच्च शिक्षणासाठी डब्लिन बिझनेस स्कूल, ऑन्गियर स्ट्रीट, डब्लिन आयरलैंड येथे निवड झाली आहे. तो २०१९ ते २०२३ या शैक्षणिक वर्षात आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेत असताना त्याने येथील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विदेशात उच्च शिक्षणासाठी ही परीक्षा जुलै २०२३ मध्ये दिली होती. या निवडी बदल आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा तसेच वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्य व आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. अदिती सारडा व आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालक डॉ. आदित्य सारडा यांनी विशेष कौतुक व अभिनंदन केले.

शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या विद्यार्थांना वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असल्याने ते आज विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. वेदांत अनिल भस्मे हा व्यवसाय विश्लेषणामध्ये मास्टर ऑफ सायन्सचो शिक्षण घेण्यासाठी डब्लिन बिझनेस स्कूल, ऑन्गियर स्ट्रीट, डब्लिन आयरलैंड येथे निवड झाली आहे. जागतिक अहवालानुसार २२४ सर्वोत्कृष्ट जागतिक विद्यापीठामध्ये डब्लिन बिझनेस स्कूल आयरलैंडमधील सर्वोत्कृष्ट विद्यापीठांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे.

आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेत असताना मी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पुढील उच्च शिक्षणासाठी डब्लिन बिझनेस स्कूल, ऑन्गियर स्ट्रीट, डब्लिन आयरलैंड येथे ऑनलाईन अर्ज केला होता. त्याची परिक्षा ऑनलाईन झाल्यानंर माझी निवड झाली. मी बिझनेस ॲनालिटिक्स स्पेशालिस्ट ॲग्रीकल्चर सर्टिफिकेशन विशेषत: ॲग्रीकल्चर डोमेनमध्ये प्रगत ॲनालिटिक्स तंत्रांच्या वापरावर लक्ष केंद्रित करत आहे. आयरलैंडच्या कृषी विभागासाठी कृषी विश्लेषक म्हणून काम करेल.

-वेदांत भस्मे

# अखेर प्रश्न मार्गी लागणार : दोन स्लिप रोड व दोन भुयारी मार्ग होणार

## केंद्रीय रस्ते विकासमंत्री नितीन गडकरी यांच्या भेटीत माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांची नवी दिल्ली येथे नुकतीच भेट घेऊन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी दोन स्लिप रोड यात बीड ते म्हाळस जवळा रस्त्यावर स्लिप रोड व बीड परळी रस्त्यावर स्लिप रोड आणि दोन भुयारी मार्ग यात आंनदवाडी फाटा व समनापूर चौक असे दोन भुयारी मार्ग करण्यात यावेत अशी मागणी केली या मागणीला मंत्रिमहोदयांनी सकारात्मकता दर्शवली असून डीपीआर मिळताच अंतिम मान्यता देऊ असे आश्वासन दिले आहे तर बीड पिंपळनेर मार्गाला राष्ट्रीय मार्गाचा दर्जा देण्याबाबत सरकार विचाराधीन असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले

संभाजीनगर ते येडशी महामार्गावर स्लीप रोड व्हावेत यासाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा पाठपुरावा सुरू आहे तसेच बीड कडे येताना आनंदवाडी जवळ आणि समनापूर चौक येथे भुयारी मार्ग व्हावा यासाठी देखील पाठपुरावा सुरू होता,



संभाजीनगर ते येडशी मार्गावर समनापुर चौक या ठिकाणी भुयारी मार्ग होणे अत्यंत गरजेचे असून बार्शी लातूर कडून येणारी वाहने बीडमध्ये येताना आणि जाताना अडचण निर्माण होते यामुळे अनेक अपघातही होत आहे तसेच संभाजीनगर कडून बीडमध्ये येत असताना आनंदवाडी या ठिकाणी भुयारी मार्ग होणे तितकेच महत्त्वाचे झाले



आहे या मार्गावर आत्तापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाला असून बीड शहरातून बाहेर जाणारी वाहनांची संख्या अधिक झाली आहे सध्या जिरेवाडी फाटा येथून शहरात येणारी जाणारी वाहतूक एकाच ठिकाणाहून असल्याने वाहनधारकांना वाहतुकीच्या कोंडीला सामोरे जावे लागते त्यामुळे या दोन्ही ठिकाणी भुयारी मार्गाची नितांत गरज आहे तसेच परळी माजलगाव कडे जात असताना राष्ट्रीय महामार्गावरून समनापूर पांगर बावडी येथे स्लिप रोडची मागणी अनेक वर्षापासून आहे समनापूर जवळ हा स्लीप रोड झाल्यास राष्ट्रीय महामार्गावरून येणारी वाहने थेट परळी कडे निघू शकतात राष्ट्रीय महामार्गावरून कुर्ला म्हाळसजवळा कडे जात असताना उड्डाण पुलाजवळ स्लिप रोडची गरज आहे,या दोन्ही स्लिप रोड ला मंजुरी देण्यात यावी अशी आग्रही मागणी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन केली आहे तसेच बीड पिंपळनेर या मार्गाला राष्ट्रीय मार्गाचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी केल्यानंतर हा प्रश्न विचाराधीन असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले आहे दोन स्लिप रोड आणि दोन भुयारी मार्ग हे अत्यंत महत्त्वाचे प्रश्न अखेर मार्गी लागणार असून माजी मंत्री क्षीरसागर यांच्या प्रयत्नाला यश आले आहे,दोन्ही स्लिप रोड आणि भुयारी मार्गाचा डीपीआर मिळताच यास मंजूर देऊ असेही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले आहे

# बीएलओव्दारे घरोघरी भेट देऊन मतदार पडताळणी सुरू

बीड । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाने दि. २० जुन, २०२४ रोजी पत्रान्वये आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक विचारात घेऊन दि. ०१.०७.२०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाचा कार्यक्रम (दुसरा) घोषीत केलेला आहे. या कार्यक्रमानुसार पुनरीक्षण पुर्व कार्यक्रम घेण्यात येणार असून त्यामध्ये २५ जुन, २०२४ पासून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांचेव्दारा घरोघरी भेट देवून मतदार पडताळणी कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

सदर पडताळणी मध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) हे

दि. ०१ जुलै, २०२४ रोजी पात्र असलेल्या परंतू नोंदणी न झालेल्या मतदारांची नोंदणी, दि. १ जुलै व १ ऑक्टोबर, ०१ जानेवारी या दिनांकास पात्र होणारे संभाव्य मतदार यांची नांव नोंदणी, मयत मतदार / कायमस्वरूपी स्थलांतरीत मतदार तसेच एकापेक्षा अधिक नोंदी असलेल्या मतदारांच्या नोंदी वगळण्यासाठी आवश्यक नमुना क्र. ७ भरून घेतील, मतदार यादीतील मतदारांच्या नोंदीतील नाव, वय, पत्ता व फोटो याबाबतच्या त्रुटी दुर करण्यासाठी नमुना क्र. ८ भरून घेतील, अस्पष्ट/अंधूक छायाचित्र बदलून त्याऐवजी संबंधित मतदाराकडून योग्य दर्जाची छायाचित्र प्राप्त करून घेतील.

वरील कामकाजानंतर दि. २५/०७/२०२४ रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यात येईल. त्यानंतर अंतिम मतदार यादीच्या कामकाजासाठी दिनांक दि. २५/०७/२०२४ ते ०९/०८/२०२४ या कालावधीत मतदाराचे दावे व हरकती स्विकारल्या जातील. यासाठी या कालावधीत मुख्य निवडणूक अधिकारी यांनी निश्चीत केलेले शनिवार व रविवार या सुट्टीच्या दिवशी मतदान केंद्रावर विशेष मोहीम राबविण्यांत येईल. त्याठिकाणी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी दिवसभर उपलब्ध ◀◀ पान ३ वर

# रक्तदान शिबीर व विविध सामाजीक उपक्रमाचे आयोजन

किल्लेधारूर । प्रतिनिधी

धारूर शहरात राजश्री शाहु महाराज जयंती उत्सव समितीचे वतीने २६ जुन रोजी विवीध सामाजीक उपक्रम व रक्तदान शिबीराचे आयोजन करून राजश्री शाहू महाराजाची जयंती साजरी करण्यात येणार असून सर्व नागरीकानी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे अवाहण उत्सव समितचे वतीवतीने करण्यात आले आहे.

धारूर शहरात प्रतीवर्षा प्रमाणे या ही वर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती समितीचे वतीने छत्रपती राजश्री शाहू महाराज यांची जयंती उत्साहात व विवीध कार्यक्रमानी साजरी करण्यात येणार असुन राजश्री शाहू महाराज चौकात मान्यवराचे हस्ते ध्वजारोहन व प्रतीमा पुजन करून जि प माध्यमिक शाळा धारूर येथे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहीत्याचे वितरण करण्यात येईल येथील हुतात्मा स्मारका मध्ये रक्तदान शिबीराचे आयोजन सकाळी १०-०० करण्यात आले आहे सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरी करण्यात येणार आहे या सर्व कार्यक्रमाला जास्ती जास्त नागरीकानी उपस्थित राहवे असे अवाहण उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष बंडोबा संवत व उत्सव समिती अध्यक्ष शरद सांवत यांनी केले

# औरंगाबाद-हैद्राबाद रेल्वेचा गुंटूर पर्यंत विस्तार

**परळी । प्रतिनिधी**

परळी रेल्वे स्थानकातून धावणारी औरंगाबाद-हैद्राबाद-औरंगाबाद या रेल्वे गाडीचा विस्तार करण्यात आला असून आता ही रेल्वे गुंटूर जक्शन पर्यंत धावणार आहे. १ जुलै पासून ही रेल्वे धावणार असल्याने या प्रवासासाठी आरक्षण देखील सुरू करण्यात आलेले आहे.



## १ जुलै पासून धावणार विस्तारित रेल्वे

स्वातंत्र्यपूर्व निजाम कालीन हैद्राबाद-परळी दरम्यान धावणारी सर्वात पहिले रेल्वे असलेल्या या गाडीस परळी-परभणी दरम्यान ब्रॉडगेज मार्ग बनविल्यानंतर औरंगाबाद पर्यंत विस्तारित करण्यात आले होते. कोळशावर चालणाऱ्या इंजिन वर धावणारी ही रेल्वे गाडी आजमितीस विद्युत इंजिन घेऊन धावत आहे.कोविड-१९ या संसर्गजन्य आजारानंतर पूर्वीची ही पॅसेंजर रेल्वे गाडी एक्सप्रेस म्हणून धावत आहे.सर्वाधित उत्पन्न आणि प्रवाशांची गर्दी याचं रेल्वे गाडीला आहे. औरंगाबाद आणि हैद्राबाद या दोन्ही रेल्वे स्थानकावर पोहचल्यावर ही रेल्वे गाडी अनेक तास रेल्वे स्थानकात उभी असते तर याच वेळेत हैद्राबाद येथून गुंटूर पर्यंत धावणारी एक्सप्रेस प्रस्थान करते.याच परिस्थितीचे अवलोकन करून दक्षिण मध्य रेल्वे कडून औरंगाबाद-हैद्राबाद रेल्वे गाडीला विस्तारित करण्यात आले आहे.

विस्तारीकरण नंतर गाडी क्रमांक १७२५३ गुंटूर जक्शन ते औरंगाबाद तर गाडी क्रमांक १७२५४ औरंगाबाद ते गुंटूर जक्शन अशी धावणार आहे.या रेल्वे गाडीच्या विस्ताराने प्रवाशांना आंध्र प्रदेशातील विजयवाडा पर्यंत जाण्यास मोठी मदत होणार आहे.या विस्तारित रेल्वे गाडीसाठी आरक्षण देखील सुरू करण्यात आले आहे.

# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेत अर्ज स्वीकारण्यास प्रारंभ

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मान्यता प्राप्त शासकीय, शासन अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालय / तंत्रनिकेतन मध्ये शासनाने निर्धारित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता वसतीगृह योजनेपासून वंचित असलेल्या इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना निवासी शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहू नये. यासाठी शासन निर्णय क्रमांक १३.१२.२०२३ व ११.०३. २०२४ अन्वये ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना कार्यान्वित करण्यासाठी शासनाने वेळापत्रक जाहीर केले आहे. सदर योजनेअंतर्गत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना, तृतीय वर्षात प्रवेश घेतलेला १५० विद्यार्थ्यांना व चतुर्थ वर्षात प्रवेश केलेल्या १५० विद्यार्थ्यांना अशा रितीने बीड जिल्ह्यातील ४५० विद्यार्थ्यांना लाभ देण्याचे शासनाने निश्चित केले आहे. यानुसार ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेकरीता पुढील प्रमाणे नमूद वेळापत्रकानुसार निवड प्रक्रिया राबविण्याबाबत कळविले आहे.

शैक्षणिक वर्ष- उच्च शिक्षणाचे द्वितीय, तृतीय, चतुर्थ वर्ष याकरिता अर्ज स्वीकारण्याची तारीख २५ -६-२०२४, अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख २० -७-२०२४ आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, बीड या कार्यालयात ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्यात यावे, असे आवाहन ( सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण) एस.एन. मेश्राम यांनी केले आहे.

# वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी संभाजी शिंदे यांची बिनविरोध निवड

**वडवणी । प्रतिनिधी**

प्रकाशदादा सोळुंके यांचा कंदील हाती घेऊन वडवणीत राजकारणाला सुरुवात करणाऱ्या संभाजी शिंदेंना परत प्रकाशदादांनी कौल देत वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतींच्या खुर्चीवर बसवत विश्वास दर्शवला, दिनेश मस्के यांच्या अकाली निधनाने रिक्त झालेल्या सभापती पदाकरिता निवडणुक झाली, नारायणराव शेळके, सचिन लंगडे, अभिमान कदम यानी सभापती पदाकरिता पूर्ण ताकद पणाला लावली, परंतु दादांचा निष्ठावान व आमचा पक्ष, एकच पक्ष प्रकाशदादा म्हणून मिरवणाऱ्या संभाजी शिंदे गळ्यात सभापती पदाची माळ घातली.

प्रकाशदादांच्या आदेशाने जयसिंग सोळके यांनी सर्व संचालकांना विश्वासात घेऊ बिनविरोध सभापती करण्याचा ठराव मांडला व त्याला सर्व संचालकांनी एकमुखी संमती देत संभाजी शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली निवडीनंतर वडवणी कृषी उत्पन्न बाजार समिती प्रांगणात समर्थकांनी एकच जल्लोष केला, दिवसभर वडवणी शहरांमध्ये नवनिर्वाचित सभापती संभाजी शिंदे यांचा ठिकठिकाणी हृदय सत्कार करण्यात आला, यावेळी जयसिंग भैय्या सोळंके, नगराध्यक्ष शेषराव जगताप, संजय आंधळे,(पान ३ वर)




## दादांच्या, भैय्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही -संभाजी शिंदे

**सभापती पदाची माळ गळ्यात पडताच संभाजी शिंदे यांनी थेट कारखाना गाठत आमदार प्रकाशदादा सोळंके व धैर्यशीलकाका सोळंके यांचे आशीर्वाद घेत ,एक वर्ष उशिरा का होईना शेवटी दादांनी व भैय्यांनी मला न्याय दिला, दादांच्या व भैयांनी आजवर मला खूप काही दिले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे, व भविष्यातही सोळंके परिवारासाठी काहीही करण्याची आपली तयारी असून दादांचा शब्द शीरसंधान मानत आपण काम करणार त्यांनी टाकलेला विश्वास मी सार्थ ठरवील अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.**

# मराठा आरक्षणासाठी तरुणाने संपवले जीवन; चिठ्ठी लिहून केली आत्महत्या

**मादळमोही । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण करून राज्यात मोठा लढा उभा केला आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन गेल्या काही महिन्यांपासून राज्यातील वातावरण ढवळून निघाले आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाचा निर्णय घेण्यासाठी राज्य सरकारला एक महिन्याची मुदत दिली आहे. तर दुसरीकडे आरक्षण मिळण्यासाठी तरूणांच्या आत्महत्या सुरूच आहेत. गेवराई तालुक्यातील भंडगवाडी येथील युवकांनी दि. २५ जून रोजी पहाटे चिठ्ठी लिहून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.



ही घटना आज सकाळी उघडकीस आली असून तालुक्यातील भंडगवाडी येथील कृष्णा विष्णु पायघडे (वयवर्ष २७) आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव असून त्यांच्या जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. लिहिलेल्या चिठ्ठीत मी शिकून काहीच फायदा नाही आरक्षण नसल्यामुळे नोकरी मिळाली नाही शिक्षण घेऊन काहीच


# घुंगराची बैलगाडी ग्रामीण भागातून नामशेष होण्याच्या मार्गावर

## शेतीच्या यांत्रिकीकरणाचा परिणाम; शेतकऱ्यांचा मित्र म्हणून ओळखला जाणारा बैल गायब होत चालला आहे

**ज्योतीराम पाढंरपोटे । माजलगाव**

शेतकऱ्यांचा मित्र म्हणून ओळखला जाणारा बैल ग्रामीण भागातून गायब होत चालला आहे. शेतीच्या यांत्रिकीकरणामुळे बैलांमार्फत केली जाणारी शेती कमी झाली असून ट्रॅक्टर, पॉवरटिलर, रोटॅविटरचा वापर वाढला आहे. आधुनिकीकरणामुळे बैलगाडी व बैल जोड्या शो-पीस ठरू लागल्या आहेत.





पूर्वी ग्रामीण भागातील मुख्य दळणवळणाचे साधन म्हणून बैलगाडी होती. इंधन तसेच यांत्रिक वाहने येण्यापूर्वी याचा वापर शेतमाल वाहण्यासाठी व शेतीतील कामे करण्यासाठी केला जात होता.पूर्वीच्या काळात लग्नाला वऱ्हाड घेऊन जाण्यासाठी बैलगाडीचा वापर होत असे.बैल हा शेतीच्या कामासाठी वापरला जायचा. नांगरणी,मोगडा,पाळी,कोळपणी, खळ्यावरची मळणी,पेरणी,मोट ओढणे अशा कामासाठी बैलांचा वापर होत होता.शेतीसह नागमोडी वाट असो किंवा सपाट-सखल मातीच्या कच्च्या रस्त्यावरून सुसाट वेगाने धावणारी शेतकऱ्यांची बैलगाडीचे दर्शन आता दुरापास्त झाले आहे.प्राचीन काळात राजवटीत रथ होता. तेव्हापासून शेतकऱ्यांचे वाहतुकीचे साधन असलेल्या बैलगाडीला महत्त्वाचे स्थान होते.घरापुढे बैलगाडी असणे ही प्रतिष्ठेची बाब मानली जात होती.पूर्वी रस्त्यांचा विकास झालेला नव्हता.बैलगाडी त्यावेळी दळणवळणाचे प्रमुख साधन होते. बैलगाडीतूनच नवरदेवाची वरात काढली जात असे, तसेच देवदेवतांची मिरवणूक काढली जात होती.आयती लोखंडी बैलगाडी मिळू लागल्याने लाकडी बैलगाडीकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवली आहे. विज्ञानाचा विकास होत गेला, डोंगर-दऱ्यातून पक्के रस्ते तयार झाले. दळणवळणाच्या साधनांमध्ये वाढ झाली. शेतकऱ्यांकडे ट्रॅक्टर,रिक्षा,टेम्पो व इतर मालवाहतूक साधने आली. त्यांच्या मदतीने जलद वाहतूक होऊ लागली.शेतीचे कामेही जलद गतीने होऊ लागल्याने वेळेची बचत झाली. शेतमाल ट्रॅक्टरने व रिक्षा,टेम्पोने बाजारात जाऊ लागल्याने बैलगाडीची गरज कमी झाली.तालुक्यात आता कमी प्रमाणात बैलगाड्या शिल्लक आहेत.त्यामुळे येणाऱ्या पिढीला पुस्तकात बैलगाडी बघायला मिळेल, असे वाटू लागले आहे.बैलाच्या मानेवर असणारे 'जू' मात्र लाकडाचे आहे.तेवढी एकच जुनी खुण शिल्लक राहिली आहे. बैलगाडीचा प्रवासासाठी होणारा उपयोग जवळ जवळ आता बंदच झाला आहे. साधारणपणे बैलगाडीला आखरी,साटा,दांड्या जू आदी भाग असतात,तसेच मोठ्या गोलकार आकाराची चाके असतात.त्याला धाव असे म्हणतात. त्यांना जोडणारा आक व चाक निखळून पडू नये, म्हणून त्याला कुनी असते.या चाकांना ऑईल टाकले जाते. त्याला 'वंगण' असे म्हटले जाते. काळाच्या ओघात बैलगाडी नामशेष झाल्याने तरुण पिढीला फक्त चित्रातील बैलगाडी पाहायला मिळत आहे.

अलीकडच्या काही वर्षांत लाकडी वखर,नागर, तिफन, कोळपे,औत आदी शेतीपयोगी अवजारे काळ्या मातीतून गायब होत चालली आहेत.नवनवीन तंत्रज्ञानामुळे पारंपरिक पद्धतीने होणारी शेती आता मागे पडत चालली आहे आधुनिक पद्धतीने शेती होऊ लागली आहे,आता असे म्हणण्याची वेळ आली आहे

आधुनिक तंत्रज्ञानाच्या परिणामामुळे ग्रामीण भागातही वाहनाचा वापर अधिक वाढला आहे.त्यामुळे ग्रामीण भागात वाहतुकीचे महत्त्वाचे साधन असलेले पुरातन बैलगाडी नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. शेतकऱ्यांची शान समजली जाणारी बैलगाडी आता काळाच्या ओघात मर्यादित होत चालली आहे.

### बैल ठरू लागला कालबाह्य

शेतकऱ्यांकडून बैलांचा शेतीसाठीचा वापर कमी झाला. कारखान्यावरील ऊस वाहतुकीसाठी बैलांचा वापर केला जात आहे. ट्रॅक्टरचा वापर करून शेती केली जात असल्याने बैल कालबाह्य ठरू लागला आहे. महाराष्ट्रीयन सण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बैलपोळा सणादिवशी शेतकरी बैलजोडी ऐवजी ट्रॅक्टरची मिरवणूक काढतात. वाढत्या यांत्रिकी साधनांमुळे शेतकऱ्यांकडून ही बैलजोडी ट्रॅक्टरला अधिक पसंती दिली जात आहे.

### बैल सांभाळण्याचा खर्च न परवडणारा

आधुनिक युगात बैलांच्या सहाय्याने शेती करण्याचे प्रमाण अतिशय कमी झाले आहे. काही शेतकरी शेतीच्या कामापुरतेच बैल घेतात.शेतीची कामे झाल्यानंतर ते विकून टाकतात. त्यामुळे गावात एखादी दुसरी बैलजोडी दिसते.त्यातच पावसाच्या लहरीपणामुळे शेती ही वाया जात असल्याने अगोदरच कर्जाच्या बोजाखाली सापडलेल्या शेतकऱ्याला बैलांचा खर्च परवडत नसल्याची खंत शेतकरी बोलून दाखवत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# एल थ्री पबवर महापालिकेचा हातोडा, शहरातील २६ बार अन् पब्जवर कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

गोपाळ कृष्ण गोखले रस्त्यावरील (फर्ग्युसन महाविद्यालय रस्ता) लिक्विड लेझर लाउंज (एल थ्री) पबवर आज (ता. २५) महापालिकेच्या बांधकाम विभागाने कारवाई केली. कोणतीही परवानगी न घेता इमारतीमध्ये केलेल्या अंतर्गत बदलांमुळे हे बेकायदेशीर बांधकाम पाडून टाकण्यात आले. त्यासह शहरातील अन्य रुफटॉप, बार, पब सह एकूण २६ ठिकाणी कारवाई करून सुमारे ३६ हजार ५०० चौरस फुटांचे अनधिकृत बांधकाम पाडून टाकण्यात आले आहे.




शहरातील पब, बारमध्ये नियमांचे उल्लंघन होत असून, पहाटेपर्यंत तेथे पार्ट्या सुरु आहेत. त्यातच पबमध्ये होणाऱ्या पार्ट्यांमध्ये तरुणांकडून अंमली पदार्थ्यांचे सेवन केले जात असल्याचे समोर आले आहे. गेल्या महिन्यात पबमध्ये दारू पिऊन अल्पवयीन मुलाने भरधाव पोर्शे ही महागडी गाडी चालवून दोघांचा बळी घेतला. त्यानंतर पोलिस, राज्य उत्पादन शुल्क विभाग, महापालिकेतर्फे कारवाई सुरु असल्याने पबचालकांचे धाबे दणाणले आहेत. हे प्रकरण शांत होत नाही तोपर्यंत फर्ग्युसन रस्त्यावरील एल थ्री पबमध्ये पहाटेपर्यंत पार्टी सुरु होती. त्याचे व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाले आहेत. याप्रकरणात पोलिसांचे निलंबन झाले असून, पब चालक भागिदारांना अटक झाली आहे. विधिमंडळ अधिवेशनात राज्य सरकारला या प्रकरणात विरोधकांच्या प्रश्नांना सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे कारवाईचा बडगाही उचलला जात आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पबवर कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर महापालिकेच्या बांधकाम विभागाने एल थ्री पबमधील बेकायदेशीर बांधकाम पाडून टाकले आहे. ही कारवाई सुरु असताना फर्ग्युसन रस्त्यावर बघ्यांची मोठी गर्दी झाली झाली होती. त्याच प्रमाणे वडगाव बुद्रूक येथील हॉटेल द अर्बन हारवेस्ट, खराडीतील ७ अ रेस्टॉरंट, माफिया बार, स्पाईन फॅक्टरी, आयन बार बालेवाडी हायस्ट्रीट, द अर्बन फॅंड्री, टेटूलिया बेरिस्टो, नबाब एशिया, बटर अँड बार, हॉटेल ग्रीन सिग्नल, सुप्रिम स्नॅंडविच कॉर्नर जंगली महाराज रस्ता, चैतन्य पराठा, हॉटेल वैशाली यासह २९ ठिकाणी कारवाई करून ३६ हजार ८४५ चौरस फुटाचे बांधकाम पाडून टाकण्यात आले आहे.

## जगदीश मुळीक यांनी अखेर दावा ठोकला, अजित पवारांच्या विद्यमान आमदाराच्या मतदारसंघातून लढण्याची घोषणा

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघावर भाजपचे माजी आमदार जगदीश मुळीक यांनी दावा केला आहे. सध्या या मतदार संघात राष्ट्रवादीचे सुनील टिंगरे आमदार असल्याने महायुतीत वादाची शक्यता आहे. मात्र महायुतीत जागावाटप होण्याआधीच जगदीश मुळीक यांनी आगामी विधानसभा निवडणूक वडगावशेरी विधानसभा मतदारसंघातून लढवणार असल्याचा दावा केला आहे. तसे फ्लेक्स मुळीक यांच्या समर्थकांकडून मतदारसंघात लावण्यात आलेत.

जगदीश मुळीक हे टिंगरे यांचे परंपरागत विरोधक असून त्यांनी विधानसभेची एक निवडणूक टिंगरेंच्या विरोधात जिंकली होती तर एका निवडणुकीत त्यांनी पराभव पत्करावा लागला होता. यामुळे महायुतीत वाद होण्याची शक्यता आहे. वडगावशेरी मतदारसंघात महायुतीचे उमेदवार म्हणून जगदीश मुळीक विधानसभाच्या तयारीला लागले आहेत. लोकसभेसाठी जगदीश मुळीक हे प्रबळ दावेदार मानले जात होते. मात्र भाजपने जगदीश मुळीक यांचं तिकीट कापत मुरलीधर मोहोळ यांनी लोकसभेची उमेदवारी दिली होती. लोकसभा निवडणुकीला एक पाऊल मागे घेत मुळीक यांनी मुरलीधर मोहोळ यांचा जोर दार प्रचार केला, म्हणून आता मुळीक यांना विधानसभेचे वेध लागले आहेत. तशी त्यांनी कामाला सुरुवात देखील केली आहे.

पोर्शे प्रकरणात सुनील टिंगरे चर्चेत

परंतु सध्या वडगावशेरीचे विद्यमान आमदार सुनील टिंगरे हे बंडखोरीनंत शरद पवार गटामध्ये सहभागी न होता अजित पवार यांच्याबरोबर गेले. पुण्यातील पोर्शे प्रकरणानंतर सुनील टिंगरे हे चांगलेच चर्चेत होते. पोर्शे प्रकरण पुण्यातल्या गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत पोहोचलं. आमदार सुनील टिंगरे यांनी प्रकरण दाबण्यासाठी पोलिसांवर दबाव आणला अशी चर्चा होती. परंतु आपण फक्त आढावा आणि माहिती घेण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये गेलो होतो असं स्वतः सुनील टिंगरे यांनी माध्यमापुढे येऊन सांगितलं होते. पण अजूनही हा विषय संपलेला नाही. त्यामुळे आता ही जागा सुनील टिंगरे यांचा विचार होणार का, याकडे वडगावशेरीमधील मतदारांच लक्ष लागलं आहे.

सुनील टिंगरेंचा विचार होणार का?

दुसरीकडे लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच अजित पवार पक्षचा झालेल्या पराभवामुळे विधानसभेला दादांच्या पारड्यात किती जाग पडतील यांची खात्री नाही. या मधील वडगावशेरी विधानसभेची जागा मिळेल का, याविषयी शंका आहे. दुसरीकडे सुनील टिंगरे यांच्यावर पक्षाची नाराजी असल्याच्या चर्चा देखील दबक्या आवाजात सुरू आहे. जरी उमेदवारी दिली तरी पोर्शे प्रकरणानंतर मतदार कौल देतील का? असा देखील सवाल आहे.

## पुणे पोर्शे कार अपघात प्रकरण : अल्पवयीन आरोपीला जामीन मंजूर

**पुणे । प्रतिनिधी**

देशभरात खळबळ उडवून देणार्या पुणे येथील पोर्शे कार अपघात प्रकरणातील अल्पवयीन आरोपीला आज (दि.२५)

मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. मद्यधुंद अल्पवयीन मुलाने भरधाव पोर्श कारने चालवत रविवार, १९ मे रोजी पुण्यातील दोन आयटी इंजिनिअरला चिरडले होते. संशयित आरोपीच्या सुटकेसाठी त्याच्या नातेवाईकाने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मागील सुनावणीवेळी दोन्ही बाजूंच्या युक्तीवादानंतर न्यायालयाने मंगळवार, २५ जूनपर्यंत आपला निर्णय राखून ठेवला होता.




मागील सुनावणीवेळी उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, या अपघातात ठार झालेल्या तरुण आणि तरुणीच्या कुटुंबीयांना धक्का बसला आहे. तसेच दारूच्या नशेत हा अपघात घडवणारा अल्पवयीन युवकही मानसिक धक्क्यात आहे. या घटनेचा परिणाम त्याच्या मनावर झाला असेल, असे स्पष्ट करत न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर आपला निर्णय राखून ठेवत २५ जून रोजी पुढील सुनावणी होईल, असे स्पष्ट केले होते. पुण्यातील कार अपघात प्रकरणातील अल्पवयीन आरोपीने तो दारू पीत असल्याचे मान्य केले आहे. धक्कादायक बाब म्हणजे मुलगा दारु पित असल्याचे त्याच्या वडिलांना माहित होते. तरीही त्यांनी त्याला अलिशान पोर्शे कार चालविण्यास दिली असल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे. पोर्शे कार अपघातातील आरोपीचे वडील, 'ब्रह्मा ग्रुप'चे विशाल अग्रवाल यांच्यासह हॉटेल मालक प्रल्हाद भुतडा, व्यवस्थापक सचिन काटकर, हॉटेलचे मालक संदीप सांगळे, बार व्यवस्थापक जयेश बोनकर अशा चार जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. विशाल अग्रवाल याला २१ मे रोजी अटकही करण्यात आली होती.

## गरिबीला प्रतिष्ठा देणारी राजकीय व्यवस्था चुकीची-विनय हर्डीकर

**पुणे । प्रतिनिधी**

लोकांना महत्त्वाकांक्षी न बनविता त्यांना मोफतच्या गोष्टी अधिकाधिक देऊन गरीब बनविले जात आहे. गरिबी हटविण्यापेक्षा गरिबी जोपासण्याचे काम सरकार करत आहे. गरिबीला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारी ही राजकीय व्यवस्था चुकीची आहे, अशा शब्दांत ज्येष्ठ लेखक, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते विनय हर्डीकर यांनी सोमवारी राजकीय व्यवस्थेवर टीका केली.



विनय हर्डीकर यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस व ज्येष्ठ पत्रकार आनंद आगाशे यांनी त्यांची मुलाखत घेतली, त्या वेळी हर्डीकर बोलत होते. या वेळी हर्डीकर यांनी विविध विषयांवर विचार मांडले. 'साधना'चे संपादक विनोद शिरसाठ या वेळी उपस्थित होते.

हर्डीकर म्हणाले, शेतकर्यांच्याही खात्यावर पैसे टाकले जात आहेत. त्यामुळे आंदोलनाची संख्या कमी झाली आहे. शेतकरी संघटनांना त्यांचा प्रभाव वाढवायचा असेल, तर पुन्हा एकदा 'भीक नको' अशी भूमिका घ्यावी लागेल, अन्यथा राजकीय व्यवस्था गरिबीला प्रतिष्ठा देण्याचे कार्य सुरूच ठेवेल.

मला एकीकडे शास्त्रीय संगीत आवडते, तर दुसरीकडे कविता, असे सांगत हर्डीकर म्हणाले, एक कवितासंग्रह होईल एवढ्या कविता मी लिहिलेल्या आहेत. कविता प्रचंड लिहिल्या, मात्र त्या प्रकाशित करण्याचे धाडस केले नाही. मी वाड्:मयाचा समाजसेवक नाही. मला ज्या गोष्टीत आनंद मिळतो, तोपर्यंतच त्या क्षेत्रात काम करतो. सृजनशील माणसांवर आणि प्रतिभावंतांवर आजचे चाहते लोक नेहमी अन्याय करत आले आहेत. आम्हाला अजून द्या, आम्हाला अजून द्या, असे त्या माणसाला बोलून अडकवून ठेवतात. माझ्यासारख्या माणसाने हे कधीही मान्य केले नाही, अशी टिप्पणीही हर्डीकर यांनी केली. मी नोकरी कधीच शोधली नाही, तर नोकरीने मला शोधले. भराभरा लिहिलेही नाही. कधी पुरस्काराच्या मागेही धावलो नाही. आपण कायम यशापयश उभे मोजतो. यश आणि अपयश आपण आडव्या पद्धतीने का मोजत नाही? असा प्रश्न उपस्थित करून मी दीर्घकाळ कोठेच टिकलो नाही. नव्या गोष्टींनी मला कायमच आकर्षित केले. मी नेहमी वेगवेगळे पर्याय शोधले, अशा पद्धतीने हर्डीकर यांनी आपला प्रवास बोलका केला.

## बहिणीला पळवून नेल्याच्या रागातून भावाने मुलाच्या वडिलांना संपवले, येरवड्यातील भयंकर घटना

**पुणे । प्रतिनिधी**

बहिणीला पळवून नेल्याच्या संशयातून प्रेयसीच्या भावाने प्रियकरांच्या वडिलांचा खून केल्याची धक्कादायक घटना पुणे शहरात घडली आहे. कटाळू कचरू लहाडे असे मृत व्यक्तीचे नाव असून पुण्यातील (झींपिश उीळाश) येरवडा भागात घडलेल्या या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पोलिसांनी तरुणीचा भाऊ इस्माईल शेख ( २५ वर्षे) याला ताब्यात घेतले आहे. या घटनेने मोठी खळबळ उडाली आहे.

पुण्यातील येरवडा भागात ही धक्कादायक घटना घडली आहे. लहाडे व शेख कुटुंबीय एकाच परिसरात वास्तव्यास आहे.




कटाळू यांचा मुलगा आणि इस्माईल याची बहिण या दोघांमध्ये मैत्री होती. आज सकाळी कटाळू यांचा मुलगा व संबंधित तरुणी घरातून निघून गेले. बहिणीला कटाळू यांच्या मुलानेच पळवून नेल्याचा संशय इस्माईल याला आला. त्या रागातूनच आज कटाळू याच्यावर इस्माईल याने रागातून धारदार शस्त्राने वार करून त्यांचा खून केला.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रियकराने बहिणीला फूस लावून पळवून नेऊन आंतरधर्मीय विवाह केल्याच्या रागतून मुलीच्या भावाने टोकाचे पाऊल उचलले आहे. तरुणीचा भाऊ इस्माईल शेखने कोयत्याने सपासप वार केले आहे. लहाडे उभे असताना दुचाकीवर आलेल्या दोघांपैकी एकाने लहाडे यांच्यावर कोयत्याने सपासप वार केले. यामध्ये लहाडे यांच्या डोक्याला आणि हातावर वार केल्याने प्रचंड रक्तस्त्राव झाला आणि त्यांचा जागेवरच मृत्यू झाला. मृत लहाडे यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवून देण्यात आला आहे. एकीकडे कोयता गँग, ड्रग्ज प्रकरणाने पुण्याचे वातावरण तापले असताना या भयंकर घटनेने मोठी खळबळ उडाली आहे. घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे.

## दौंडमधील मटका अड्ड्यावर ७ महिन्यांनंतर पुन्हा कारवाई

**दौंड । प्रतिनिधी**

दौंड पोलिसांनी कारवाई करून ऑनलाइन मटका जुगाराचे आकडे घेणाऱ्या एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला. सात महिन्यांत दुसऱ्यांदा या अड्ड्यावर कारवाई केली आहे.

दौंड शहरातील शालीमार चौकात देशी दारू दुकानाशेजारील परिसरात एका गाळयात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर २४ जून रोजी ही कारवाई केली. त्यात टॅब, टेलिव्हिजन संच, ऑनलाइन जुगाराचे साहित्य व रोख रक्कम, असा एकूण साडेसात हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. याप्रकरणी दौंड पोलिस ठाण्याचे कॉन्स्टेबल अमोल गारूडी यांनी फिर्यादी दिली. त्यानुसार मटक्याचे आकडे घेणारा अब्राहम थॉमसन दोरखंडे (वय ३१, रा. शालीमार चौक, दौंड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस मदत व तक्रार निवारणासाठी असलेल्या नियंत्रण कक्षाच्या ११२ या टोल फ्री क्रमांकावर ३ नोव्हेंबर २०२३ रोजी दौंड तालुक्यातील एका नागरिकाने या अड्ड्यावर युवक जुगार खेळत असल्याची तक्रार केली होती. त्यानंतर या अड्ड्यावर कारवाई करून अब्राहम दोरखंडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. पुणे ग्रामीण पोलिस दलाची स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा आणि दौंड पोलिसांकडून ऑनलाइन मटका व चिठ्ठ्यांवर चालणाऱ्या जुगार अड्डाचालकावर ठराविक कालावधीतच कारवाई केली जाते. परंतु अड्ड्याचे मालक आणि दौंड तालुक्यात राजरोस ऑनलाइन मटका चालविणाऱ्या टोळीची माहिती असूनही त्यांच्यावर मात्र कुठलीही कारवाई केली जात नाही.

## श्री चिंतामणीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**उरुळी कांचन । प्रतिनिधी**

अंगारकी चतुर्थी निमित्त अष्टविनायकांपैकी एक असलेल्या थेऊर (ता. हवेली) येथील श्री चिंतामणीच्या दर्शनासाठी भाविकांनी अलोट गर्दी केली होती. पहाटे पुजारी आगलावे बंधू यांच्या हस्ते श्रींची विधिवत पूजा केली. चिंचवड देवस्थानच्या वतीने श्री चिंतामणीची महापूजा झाली. पहाटेपासूनच भाविक दर्शनासाठी दाखल झाल्याने दर्शन बारी मंदिराच्या प्रवेशद्वारापर्यंत आली होती.

सायंकाळी चिंतामणी भजनी मंडळ यांच्या साथीने शंकर महाराज फताळ यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. चंद्रोदयानंतर श्रींचा छबिना निघाला. त्यांनतर उपस्थित भाविकांना ग्रामस्थांतर्फे महाप्रसाद दिला. देवस्थान तर्फे



सुरक्षा व्यवस्था तसेच ग्रामपंचायतीतर्फे पार्किंगची व्यवस्था केली होती. देवस्थानचे विश्वस्त केशव उमेश विद्वांस हे लक्ष ठेवून होते.

मंदिराच्या गाभाऱ्यात रंगीबेरंगी फुलांची आरास करण्यात आली होती. तसेच श्रीं च्या मूर्तीला फुलांनी सजविण्यात आले होते. देवस्थान तर्फे मंदिर प्रांगण आणि मंदिराबाहेर मंडप व पत्रा शेड घालण्यात आले होते. चिंचवड देवस्थान ट्रस्ट आणि दर्पण ब्लड सेंटर यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले होते. भाविकांनी मोठ्या प्रमाणात शिबिरात सहभाग घेऊन रक्तदान केले. देवस्थान तर्फे भाविकांना उपवासाची खिचडी वाटण्यात आली.

## पुण्यात ड्रग्ज घेणाऱ्या दोन्ही तरूणांची ओळख पटली, मुंबईचा तरूण आर्किटेक्ट तर दुसरा सॉफ्टवेअर इंजिनिअर

पुणे । प्रतिनिधी

शहरातील लॉऊन्ज पब प्रकरणात ताब्यात घेण्यात आलेल्या दोन्ही तरुणांनी ड्रग्जचं सेवन केल्याची कबुली दिली आहे. त्या तरूणांची ओळख पटली असून या दोन्ही तरुणांची ओळख अशाच पार्ट्यांमध्ये झाल्याचं समोर आलं आहे. यातील एक तरूण हा मुंबईतील गोरेगावचा असल्याची माहिती आहे. तर दुसरा तरूण हा पुण्यातील मुंढवा भागातील आहे. विशेष म्हणजे दोन्ही तरूण हे उच्चशिक्षित असून एकटा आर्किटेक्ट आहे तर दुसरा सॉफ्टेवअर इंजिनिअर आहे.




पुण्यातील एफसी रोडवरील ङ३ बार मधील एक व्हिडीओ समोर आला होता. त्या व्हिडीओमध्ये दोन तरूण ड्रग्ज घेत असल्याचं दिसत होतं. या व्हिडीओनंतर पोलिसांनी दोघांचा तपास घेत त्यांना ताब्यात घेतलं. त्यांच्या चौकशीदरम्यान त्यांनी ड्रग्ज सेवन केल्याची कबुली दिली. त्यामुळे ङ३ लाउंज पबमध्ये ड्रग्ज घेतले जात होते यावर शिक्कामोर्तब झालं. मुंबईचा तरूण ड्रग्ज घेऊन पुण्याला आला मुंबईत राहणारा तरूण हा आर्किटेक्ट आहे आणि तो मेफेड्रॉन घेऊन पुण्यात आला होता. तर दुसरा तरूण हा पुण्यातील मुंढव्यातील असून तो सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे. या दोघांची ओळख एका पार्टीमध्ये झाली होती. हे दोघे शनिवारी संध्याकाळी एकत्र आले आणि रात्री एल थ्री या पबमध्ये गेले. हे दोघे द कल्ट या पबमध्ये आधी झालेल्या पार्टीत सहभागी झाले नव्हते. द कल्ट या पबच्या मालकावर देखील पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. सुरुवातीला द कल्ट या पबमध्ये पार्टी झाली आणि नंतर मध्यरात्री दीडनंतर पुढची पार्टी ही एल थ्रीमध्ये सुरू झाली. यातील एका तरूणाला मुंबईतून अटक करण्यात आली तेव्हा त्याच्याकडे पाच ग्रॅम मेफेड्रॉन आढळून आले. हे मेफेड्रॉन त्यानं मुंबईतून खरेदी केले होते. त्यामुळे पुण्यासोबतच मुंबईमध्येही मेफेड्रॉन ड्रग्जची विक्री होत असल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तपास आता पुणे पोलिसांसोबत मुंबई पोलिसांकडूनही केला जाण्याची शक्यता आहे.

नेमकं काय आहे प्रकरण?

पुण्यातील सर्वात व्यस्त रस्त्यांपैकी एक असलेल्या एफ सी रोडवरील या लिक्विड लेझर लाउंज या पबमधे ड्रग्ज घेतलं जात असल्याचं उघड झाल्यानंतर अनेक प्रश्न निर्माण झालेत . पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत या हॉटेलचा , मालक , मॅनेजर , कर्मचारी आणि पार्टीचे आयोजन करणाऱ्या व्यक्तींसह आठ जणांना अटक केलीय. रात्री एक वाजेपर्यंत पब सुरु ठेवण्यास परवानगी असताना पाठीमागच्या दराने रात्री दीड वाजता पन्नास जणांना या पबमधे प्रवेश देण्यात आला . या पार्टीमध्ये आलेले पन्नास जण शनिवारी संध्याकाळी हडपसरमधील कल्ट या पबमधे पार्टीसाठी जमले होते.

### खोरवडी येथे रोहित्रातून ६० किलो तारांची चोरी

**दौंड । प्रतिनिधी**

खोरवडी (ता. दौंड) येथील एका रोहित्रातून एकूण ६० किलो तांब्याच्या तारांची चोरी झाली आहे.

याबाबत दौंड पोलिसांनी माहिती दिली की, खोरवडी येथील जगताप- पांढरे नावाने ओळखल्या जाणाऱ्या २२ किलोवॅट क्षमता असलेल्या रोहित्रातून २१ जून रोजी ही चोरी झाली. चोरट्यांनी वीजप्रवाह खंडित करून रोहित्र खांबांवरून खाली पाडले. त्यानंतर त्या रोहित्रामधील ऑइल जमिनीवर सांडून त्यामधील ६० किलो वजनाच्या तांब्याच्या तारा चोरट्यांनी चोरून नेल्या. चोरीस गेलेल्या तारांचे मूल्य तीस हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. याबाबत महावितरणच्यावतीने शरद जाधव यांनी २४ जून रोजी दौंड पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## अनधिकृत पबवर भाजपही आक्रमक

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील अनधिकृत पबच्या विरोधात विरोधकांसह आता सत्ताधारी भाजपही आक्रमक झाली आहे. शहरातील सर्व पब बंद न केल्यास व पुण्याची संस्कृती बिघडविण्याचा प्रयत्न केल्यास प्रशासनाच्या विरोधात रस्त्यावर उतरण्याचा इशारा भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी दिली आहे.

महिनाभरापूर्वी कल्याणीनगर येथील पबमधून निघालेल्या बांधकाम व्यावसायिकाच्या मुलाने दोघांचा बळी घेतल्यानंतर शहरातील पब संस्कृतीच्या आड सुरू असलेला गोरखधंदा चव्हाटचावर आला. यामुळे शासनाची नाचक्की झालीच. यातून मोठ्याप्रमाणावर कारवाई सुरू झाली. यानंतरही रविवारी फग्युर्सन रस्त्यावर एका पबमध्ये रात्री उशिरापर्यंत दारूविक्री आणि पार्टी सुरू होती. या पार्टीमध्ये अमली पदार्थांचेही सेवन सुरू असल्याचे उघड झाले. यामुळे पुन्हा एकदा प्रशासकीय यंत्रणा आणि पबचालकांचे साटेलोटे असल्याचे स्पष्ट झाले. या घटनेवरून पुन्हा सत्ताधारी विरोधकांच्या रडारवर




आले आहेत. पोलिस आयुक्तांनी याची गंभीर दखल घेत एका पोलिस निरीक्षकासह तीन कर्मचारी निलंबित केले.

या पार्श्वभूमीवर भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी महापालिका, पोलिस, पीएमआरडीए, उत्पादन शुल्कचे आयुक्त आणि जिल्हाधिकार्यांना निवेदन दिले आहे. या निवेदनाची प्रत मुख्यमंत्र्यांना पाठविली आहे. त्यामध्ये पुण्यात सुरू असलेले सर्व पब हद्दपार करण्याची मागणी केली आहे.

यासोबतच शहर आणि जिल्ह्यातील अधिकृत पबची यादी प्रसिद्ध करावी, गणेशोत्सवाप्रमाणेच रात्री दहानंतर पबमधील स्पीकर बंद करावेत, पब व अन्य अवैध धंद्यांची तक्रार करण्यासाठी हेल्पलाइन सुरू करावी, त्यावर येणार्या तक्रारींची दखल घ्यावी, शहरातील अमली पदार्थ व्यापार थांबविण्यासाठी पोलिसांनी काय प्रयत्न केले, याची माहिती द्यावी, रात्रीच्या वेळी वेगाने गाड्या चालविणारे आणि अश्लील चाळे, आरडाओरडा करणार्यांवर कारवाई करावी, अशी मागणी घाटे यांनी केली आहे. शहरामध्ये मोठ्या प्रमाणात गुटख्याची विक्री होत आहे, त्या संदर्भात लवकरच पर्दाफाश केला जाईल, असे स्पष्ट करत राज्य शासनालाच आव्हान दिले आहे.